शुक्रवार, १५ डिसेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १२४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 15 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-124 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05






विद्युत रोषणाईने झगमगला मल्हारगड- राज्याचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या चंपाषष्ठी उत्सवानिमित्त जेजुरीगडास विद्युत रोषणाईने सजवण्यात आले आहे. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

## २४ डिसेंबरला माझ्यावर हल्ला होईल : भुजबळ

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर : आरक्षणावरून मनोज जरांगे पाटील यांनी ज्या ज्या गोष्टी छगन भुजबळांविषयी बोलून दाखवल्या त्यांचा पुनरुच्चार करत छगन भुजबळ यांनी २४ डिसेंबरला माझ्यावर हल्ला होईल, माझेही घर जाळले जाईल, असा आरोप गुरूवारी विधानसभा अधिवेशनात केला.**

भुजबळ म्हणाले की, जरांगे म्हणाले आहेत मी त्याचा (म्हणजे माझा) कार्यक्रमच करतो. आमच्या हातात दंडुके, सरकारला तुडवू शकतो, भुजबळांनाही पाहून घेऊ. एकदा आरक्षण मिळू द्या भुजबळचा कार्यक्रमच करतो. २४ डिसेंबरचा एक मेसेज समाज माध्यमांवर फिरतो आहे. नाशिकला भुजबळ नॉलेज सिटी, भुजबळ फार्म हे पाहण्याची इच्छा ज्यांना आहे त्यांनी नावे कळवावीत असा हा संदेश आहे. माझ्यावर हल्ला करण्याची तयारी सुरु आहे. प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागर यांची घरे जाळली त्याप्रमाणेच माझेही घर जाळले जाईल. कुणी यावे अशी माझी अपेक्षा नाही. त्यापुढे जाऊन सांगतो आहे, पोलीस वाढवले आहेत. तेव्हा मी चौकशी केल्यावर कळले भुजबळांवर गोळी चालवली जाईल. मराठा आरक्षणाला माझा विरोध नाही. त्यांना वेगळे आरक्षण द्या मात्र झुंडशाही थांबवा. आज छगन भुजबळ आहे उद्या दुसरं कुणीतरी असेल. तुम्ही कोणीही त्यावर बोलणार नाही का? खऱ्या अर्थाने या प्रश्नाकडे पाहिले जाणार आहे का? कुणी यावर बोलणार आहे का? असा प्रश्न छगन भुजबळ यांनी विचारला. कुणबी नोंदी असलेल्या मराठा कुटुंबांना सरकाकडून कुणबी प्रमाणपत्र दिले जात आहे. या मराठा कुटुंबांचा कुणबी म्हणून ओबीसी आरक्षणात समावेश होणार आहे. त्याला अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री भुजबळ यांनी विरोध केला आहे.

## १५ खासदारांवर निलंबनाची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणल्याबद्दल लोकसभेने गुरुवारी काँग्रेसच्या ९ खासदारांना हिवाळी अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीसाठी निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे. गोंधळ घालणे आणि खुर्चीचा अपमान केल्याप्रकरणी आतापर्यंत १५ विरोधी खासदारांना निलंबित करण्यात आले आहे. संसदेतून निलंबित करण्यात आलेल्या १५ खासदारांपैकी ९ काँग्रेसचे, २ सीपीएम, २ डीएमके आणि एक सीपीआय पक्षाचा आहे. निलंबित करण्यात आलेल्या काँग्रेस खासदारांमध्ये टीएन प्रतापन, हिबी एडन, एस जोतिमणी, रम्या हरिदास आणि डीन कुरियाकोसे यांचा समावेश आहे. निलंबित करण्यात आलेल्या विरोधी लोकसभा खासदारांमध्ये काँग्रेसचे चार, सीपीआय, डीएमकेचे प्रत्येकी दोन आणि सीपीआय(एम)च्या एका खासदाराचा समावेश आहे. काँग्रेसच्या चार खासदारांमध्ये बेनी बेहानन, व्हीके श्रीकंदन, मोहम्मद जावेद आणि मणिकम टागोर यांचा समावेश आहे. बेहानन आणि श्रीकंदन हे केरळमधील चालकुडी आणि पलक्कड लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत, तर मोहम्मद जावेद हे बिहारच्या किशनगंजचे प्रतिनिधित्व करत आहेत आणि मणिकम टागोर हे तामिळनाडूच्या विरुधुनगरचे खासदार आहेत. या खासदारांच्या निलंबनाचा प्रस्ताव संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आणला होता. तो सभापतींच्या खुर्चीवर बसलेल्या भर्तृहरी महाताब यांनी मंजूर केला आहे. हिवाळी अधिवेशनाच्या उर्वरित दिवसांसाठी या खासदारांना निलंबित करण्यात आले आहे. यावेळी विरोधी पक्षाचे खासदार सतत सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करताना दिसले होते. नंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय तृणमूल काँग्रेसचे राज्यसभा खासदार डेरेक ओब्रायन यांना अधिवेशनाच्या उर्वरित दिवसांसाठी निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणी टीएमसीने सांगितले की, जबाबदारी टाळणे ही भाजपची सर्वात मजबूत बाजू आहे.

## दूध दरवाढीची पिलीवमध्ये ठिणगी : उत्पादकांचे चक्काजाम आंदोलन!


आधुनिक केसरी न्यूज

सुजित सातपुते

पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे पिलीव परीसरातील दूध उत्पादक शेतकऱ्यांनी दुध दर वाढीसाठी जनावरे रस्त्यावर बांधुन रस्ता रोको आंदोलन केले.शासनाने दुधाला प्रतिलीटर ३४ रुपये एवढा दर ठरवुन देऊनही सोलापूर जिल्हयातील खाजगी दुध संघ २५ ते २६ रुपये एवढा दर देत शेतकऱ्यांना लुटण्याचे काम करीत आहेत. शासनाने ताबडतोब अशा दुध संघावर कारवाई करावी व शेतकऱ्यांना ४० रुपये एवढा दर द्यावा. पशुखाद्याचे दर कमी करावेत, औषधावरील जी.एस.टी. कमी करावा या प्रमुख मागण्यांसाठी पिलीव येथे पिलीव परीसरातील सर्वपक्षीय नेते व शेतकरी बांधवांनी रस्ता रोको केला. यावेळी माजी उपसरपंच आरिफखान पठाण, अशोक बगाडे, स्वाभिमानीचे अजित बोरकर, शिवराज पुकळे, राहुल मदने, ग्रा.पं सदस्य जीवन गुरव, राजेंद्रसिंग जामदार, सागर भैस, सचिन भैस, निशांत बगाडे, विजय पिसे, अजय खुर्द यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत शासनाने ताबडतोब खाजगी दुध संघाची मनमानी थांबवित दुधाला चांगला दर द्यावा, अशी मागणी केली. सदरच्या आंदोलनाप्रसंगी शयामतात्या मदने,कुसमोडचे सरपंच महावीर धायगुडे, तुषार लवटे, विश्वजीत गोरड, अक्षय वगरे, सागर शेंडगे, अक्षय धांडोरे, जितेंद्र पाटील, डॉ. निलेश कांबळे, कुमार भैस, लहु पाटील यांच्यासह पिलीव, झिंजेवस्ती, कुसमोड, काळमवाडी, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी परीसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. वरील मागणीचे निवेदन पोलीस उपनिरीक्षक एम.एम.पुजारी यांनी स्विकारले.या रस्ता रोको वेळी पिलीव पोलीस



स्टेशनचे हवालदार पंडीत मिसाळ, सतीश धुमाळ, दत्ता खरात, अमित जाधव यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. स्वतः छपरामध्ये राहून गुरांसाठी लाखो रुपये खर्चून बांधलेल्या गोठ्यामध्ये माझा शेतकरी बांधव गुरांची पोटच्या मुलांपेक्षाही जास्त देखभाल करत असतो.दूध संघवाल्यानो त्यांच्या कामाचं आणि घामाचं दाम तुम्ही खाऊ नका खूप जड जाईल, शिवराज पुकळे यांनी सांगितले.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# साध्वीपणा आणि त्यागाची मूर्ती : ज्ञानेश्वरांची माता

आधुनिक केसरी

माझ्या मनात प्रश्न आला की ज्या संत ज्ञानेश्वरांना सारे जग माऊली म्हणून संबोधते, त्या ज्ञानेश्वरांची माऊली कशी असेल ? केवढी थोर योग्यता असेल त्या माऊलीची, की जिचा पुत्र जगद्वंद्य झाला. आपण घरोघरी शिवाजी आणि ज्ञानेश्वर जन्मावे असे म्हणतो.पण त्यांना जन्म देणाऱ्या मातांना समजून घेतल्याशिवाय हे कसे शक्य आहे ? कारण आम्रवृक्षालाच आंब्याची मधुर फळे लागतात. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी. खाण तशी माती. संत ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत कुलकर्णी.लहानपणापासूनच परमेश्वराकडे ओढा.विरक्त वृत्ती. गोदाकाठी असलेल्या आपेगावाचे रहिवासी. मुंज व त्यानंतर वेदाध्ययन झाल्यावर ते तीर्थयात्रेसाठी बाहेर पडले.द्वारका,सोरटी सोमनाथ आदी तीर्थे केली. त्र्यंबकेश्वराचे दर्शन घेतले.आणि तेथून आळंदीला आले. आळंदीला इंद्रायणीवर स्नान करून नामस्मरणासाठी बसले. त्यांच्या चेहऱ्यावर विलक्षण तेज होते. त्याचवेळी रखुमाबाईचे वडील सिद्धोपंत तेथे दर्शनासाठी आले होते. त्यांनी या तेजःपुंज तरुणाला पाहिले त्याची सर्व चौकशी केली आणि त्याला आपल्यासोबत घरी चलण्याची विनंती केली.सिद्धोपंतांनी या तरुणाला आपल्या घरी काही दिवस ठेवून घेतले. त्याचे उत्तम आदरातिथ्य केले. एके दिवशी सिद्धोपंताना परमेश्वराने दृष्टांत देऊन सांगितले की तुझी मुलगी रखुमा या मुलास दे. सिद्धोपंत आनंदले.त्यांच्याही मनात हीच गोष्ट येत होती. आपल्या सुस्वरूप, सुसंस्कारित मुलीसाठी त्यांना याहून चांगले स्थळ कुठले मिळणार होते ? मग त्यांना त्यांच्या लाडक्या रखमेची काळजी राहणार नव्हती.दुसऱ्या दिवशी त्यांनी आपल्या मनीची इच्छा विठ्ठलपंतांजवळ बोलून दाखवली आणि ईश्वरी संकेतही सांगितला. पण विठ्ठलपंतानी आपल्याला पांडुरंगाची तशी आज्ञा नाही म्हणून लग्नासाठी नकार दिला.पण ईश्वरी संकेत वेगळेच असतात. विठ्ठलपंत आणि रुखमाबाई यांचे लग्न व्हावे अशी ईश्वरी इच्छा होती. त्याप्रमाणे परमेश्वराने म्हणजे साक्षात विठ्ठलाने त्यांच्या स्वप्नात येऊन दृष्टांत दिला की या सिद्धोपंतांच्या मुलीशी लग्न कर.तिच्या उदरी चार ईश्वरी अवतार जन्म घेणार आहेत. आणि दुसऱ्या दिवशी त्यांनी आपला निर्णय म्हणजेच होकार सिद्धोपंताना सांगितला. **क्रमशः**





# आनंदी पहाट

## सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव असावी

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सामाजिक जबाबदारी हा एक नैतिक सिद्धांत आहे, ज्यामध्ये व्यक्ती त्यांचे नागरी कर्तव्य पूर्ण करण्यासाठी जबाबदार असतात आणि एखाद्या व्यक्तीच्या कृतीचा संपूर्ण समाजाला फायदा झाला पाहिजे. आर्थिक वाढ, लोकांचे कल्याण आणि पर्यावरण यांच्यात समतोल असायला हवा. हा समतोल राखला तर सामाजिक जबाबदारी पार पडते. सामाजिक जबाबदारीचा सिद्धांत नैतिकतेच्या प्रणालीवर बांधला गेला आहे, ज्यामध्ये पुढे जाण्यापूर्वी निर्णय आणि कृती नैतिकदृष्ट्या प्रमाणित केल्या पाहिजेत. कृती किंवा निर्णयामुळे समाजाची, पर्यावरणाची हानी होत असेल, तर ते सामाजिकदृष्ट्या बेजबाबदार मानले जाईल. समाजात उपजत असलेली नैतिक मूल्ये योग्य आणि अयोग्य असा भेद निर्माण करतात. सामाजिक निष्पक्षता योग्य असल्याचे मानले जाते, परंतु हे

प्रत्यक्षात दिसून येत नाही. प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे, की ती केवळ व्यक्तीसाठी नव्हे, तर समाजासाठी फायदेशीर असेल अशा पद्धतीने वागणे. सामाजिक उत्तरदायित्व आणि नैतिकतेचा सिद्धांत वैयक्तिक आणि समूह दोन्ही क्षमतांमध्ये लागू होतो. हे दैनंदिन कृती आणि निर्णयांमध्ये समाविष्ट केले पाहिजे, विशेषतः ज्यांचा इतर व्यक्तींवर आणि पर्यावरणावर परिणाम होईल. मोठ्या गटाच्या क्षमतेमध्ये, सामाजिक जबाबदारी आणि आचारसंहिता उक्त गटामध्ये तसेच दुसऱ्या गटाशी किंवा व्यक्तीशी संवाद साधताना लागू

केली जाते. व्यवसायांनी सामाजिक जबाबदारीची एक प्रणाली विकसित केली आहे, जी त्यांच्या कंपनीच्या वातावरणास अनुरूप आहे. जर कंपनीमध्ये सामाजिक जबाबदारी निभावली गेली, तर कर्मचारी आणि पर्यावरण कंपनीच्या अर्थशास्त्राप्रमाणेच धरले जाते. कंपनीमध्ये सामाजिक जबाबदारी राखणे हे सुनिश्चित करते, की समाजाची अखंडता आणि पर्यावरणाचे संरक्षण केले जाते. अनेकदा, वैयक्तिक फायद्यासाठी निर्णय आणि कृतीचे नैतिक परिणाम दुर्लक्षित केले जातात आणि अशावेळी फायदे सहसा भौतिक असतात.



आधुनिक केसरी

## ब्रह्म सुख अहोरात्र ||

निरंतर जाग जिवा | विकारांचा हा चकवा ||१||
सुख-दुःख नको भेद | मायावी हा असे नाद ||२||
वागे प्रसंगावधाने | जाणले सुख तयाने ||३||
वादावाद टाळ मना | मौने स्विकार साधना ||४||
हरि भजनी रमावे | आत्ममग्न सदा राहावे ||५||
संतसंग ज्याचे गोत्र | ब्रह्म सुख अहोरात्र ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

विषयसुख तें राहिले ।वांजपणें दुःखी केलें ।
तंव तें कुळदैवत पावलें ।जाली वृद्धी ॥३४॥
त्या लेंकुरावरी अतिप्रीति ।दोघेहि क्षण येक न विशंभती ।
कांहीं जाल्या आक्रंदती ।दीर्घस्वरें ॥३५॥
ऐसी ते दुःखिस्ते ।पूजीत होती नाना दैवतें ।
तंव तेंहि मेलें अवचितें ।पूर्व पापेंकरूनी ॥३६॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

सेवा गुरुडम्ब नाहिं है, हे मतिमन्द गवार ।
तत्त्व दरशी आचार्य की, सेवा जन्म सुधार ।।२७।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/२७

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
हे अल्पबुद्धि तथा अज्ञानी जीवांनो ! सेवा म्हणजे अंध गुरुभक्ती नव्हे. सर्वतत्त्वद्रष्टा आचार्यांच्या सेवेद्वारे जीवन पवित्र होऊन आत्मा परमानंद परमप्रभूला प्राप्त करतो. सेवाहीन ज्ञान निष्फल होऊन जाते. म्हणून गुरुसेवा करून त्यांच्या कडून ब्रह्मविद्येच्या महान तत्त्वाची दीक्षा घेतली पाहिजे. सेवेविना पूर्ण दीक्षा घेण्याचा अधिकार जिज्ञासू ला असत नाही.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## रामदास स्वामी


आधुनिक केसरी



फळ हेच काय? त्यावर आक्कांनी हात जोडून विनंती केली, घाबरे होणे किंवा ममतेत गुंतणे हे काहीच समर्थांनी ठेवले नाही, पण प्रत्यक्ष सेवा व सगुणदर्शन अंतरेल याचे वाईट वाटते'; त्या वेळी त्यांच्या (व आज आपल्याही) समाधानासाठी समर्थांच्या मुखातून पुढील अभंग प्रकटला - माझी काया गेली खरे । परी मी आहे जगदाकारे । ऐका स्वहित उत्तरे । सांगेन ती ।।नका करू खटपट । पहा माझा ग्रंथ नीट । तेणे सायुज्याची वाट । ठाई पडे ।। राहा देहाच्या विसरे । वर्तो नका वाईट बरे । तेणे मुक्तीची द्वारे । चोजविती ।। रामीरामदास म्हणे । सदा स्वरूपी अनुसंधान । करा श्री रामाचे ध्यान । रिंतर ।।या अभंगाचा आशय भीमस्वामींनी दोन ओव्यांत सांगितला तो असा - माझी काया आणि वाणी ।गेली म्हणाल अंतःकरणी । परी मी आहे जग्जीवनी । निरंतर ।।आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वतःसिद्ध ।

# नामाशिवाय कशानेही समाधान नाही

आधुनिक केसरी



मनुष्य चूक करतो, आणि ‘ देवा, क्षमा कर ’ म्हणतो; पण पुन्हा पुन्हा चुका करीतच रहातो. हे काही योग्य नव्हे. अशाने काही त्याला देव क्षमा करणार नाही. ‘ देवा, क्षमा कर ’ हे म्हणणे इतके सहज होऊन बसले आहे, की त्याचा अर्थच आपल्या ध्यानात येत नाही. तो जर ध्यानात येत असता तर मनुष्य त्या चुका पुन्हा पुन्हा न करता. अशा रीतीने आपण आपल्या बुद्धीच्या बळावर परमेश्वराला फसवू शकणार नाही. बुद्धीच्या जोरावर जर आपण माणसालाही फसवू शकत नाही तर परमेश्वर कसा फसेल ? आपण आपल्या बुद्धीच्या जोरावर परमेश्वराची प्राप्ती करून घेऊ, असे म्हणणे कदापीही योग्य होणार नाही. तेव्हा शरणागतीशिवाय मार्ग नाही. ते तुम्ही करा. समाधान काही परिस्थितीवर अवलंबून नाही. कितीही पुराणे वाचली, ग्रंथ मुखोद्गत केले, प्रवचने ऐकली, तरी मनाला समाधान लाभणार नाही. त्याप्रमाणे थोडे तरी आचरण केले पाहिजे. नामात राहिले पाहिजे. नामाशिवाय इतर कोणत्याही गोष्टीने पूर्तता येऊ शकत नाही. नामाशिवाय खरे समाधान मिळणार नाही. तेव्हा तुम्ही भगवंताला अनन्यभावाने शरण जाऊन, त्याचे नाम आवडीने आणि सतत घ्या. एक गरीब वारकरी पंढरपूरला चालला होता. मोठ्या कष्टाने तो पायी चालला होता. वाटेत एक रेल्वेचे फाटक लागले, ते बंद होते म्हणून तो थांबला. इतक्यात तिथे एक मोटार येऊन उभी राहिली. आत एक मोठा श्रीमंत माणूस बसला होता. तोही पंढरपूरला चालला होता. वारकऱ्याच्या मनात आले, ‘ देवा, तुझी एवढी निस्सीम भक्ती मी करतो, परंतु माझी ही दशा; आणि हा लबाड व्यापारी, याला मात्र तू सर्व ऐश्वर्य देऊन आरामात पंढरपूरची यात्रा घडवतोस. काय तुझा हा न्याय ! ’ एवढ्यात मोटारीचे दार उघडून दोन नोकरांनी त्या श्रीमंत माणसाचे हात आपल्या खांद्यावर घेऊन त्याला खाली उतरविले. तो पांगळा होता ! वारकऱ्याने विचार केला, पांगळा होऊन आरामात पंढरपूरला जाण्यापेक्षा गरिबीत पायी जाणे बरे. आपल्याजवळ जे नाही ते ज्याच्यापाशी आहे तो सुखी असला पाहिजे, हे आपण धरून चालतो, पण तसा तो नसतो. त्याचे दुःख आपल्याला माहीत नसते. आणि तो स्वतःला जर सुखी समजत असेल, तर तो दारूच्या मदाप्रमाणे मद समजावा. आहे त्या परिस्थितीमध्ये समाधान मानणे हाच विषयाची पकड ढिली करायचा उपाय आहे. आपली परिस्थिती ही परमात्म्याच्या इच्छेने आली आहे असे आपण म्हणू या. असे जर आपण केले तर दुःखाचा आणि सुखाचा आवेग कमी होईल.
२२९. ज्याचे समाधान भगवंतावर अवलंबून आहे त्याचे समाधान कोणत्याही परिस्थितीमध्ये टिकेल.

## संत ज्ञानेश्वर माऊली

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

कार्तिक वद्य त्रयोदशी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची संजीवन समाधीची तिथी आज या विश्वाच्या माऊलीचा 728 वा संजीवन समाधी असं सोहळा. प्रत्यक्ष परमात्मा पांडूरंगाने स्वहस्ते भोजन बनवून या लाडक्या भक्ताला खाऊ घातले . काय भाग्य या बालभक्ताचे प्रत्यक्ष विश्वविधाता पांडूरंग ने जेऊ घातले म्हणजे या बालभक्ताचा अवघा देहचं अमृतमय झाला असणार.

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, १५ डिसेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# शेलुखडसे येथील शेतकऱ्यांचा शेतरस्ता मार्गी लागण्याचे संकेत

## जलसमाधी आंदोलनाचा दिला होता इशारा : प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात एकलासपुर येथे बांधण्यात आलेल्या वाकद संग्राहक लघु प्रकल्पाच्या बॅकवॉटर फुगवट्यायमुळे शेलुखडसे शेतशिवरातील अनेक शेतकऱ्यांचा शेतरस्ता संपूर्णतः पाण्यात बुडालेला असतो. त्यामुळे संबंधीत शेतकऱ्यांची गेल्या आठ, दहा वर्षांपासून मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. या बाबत अनेक वेळा सदर रस्त्यावर पुल बांधण्यासाठी मागणी करण्यात आली होती. परंतू संबंधीत प्रशासन व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत असल्याने अखेर शेतकऱ्यांनी जलसमाधी आंदोलनाचा इशारा दिला होता. सदर गंभीर बाब पोलीस प्रशासनाच्या लक्षात येताच, पोलिसांनी मध्यस्थी करत, संबंधीत प्रशासनाशी संपर्क साधून तोडगा काढण्यासाठी प्रयत्न केला असता लघु पाटबंधारे विभाग क्र.३ यांच्याकडून बुडीत रस्त्यावर पुल बांधून देण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले होते. त्यामूळे आंदोलक शेतकऱ्यांनी आपले आंदोलन स्थगित केले होते. दिलेल्या आश्वासनानुसार संबंधीत विभागाकडून नुकतेच मोजमाप करुन कृती आराखडा तयार करण्यात येत असल्याने, सदर रस्त्याचे काम मार्गी लागण्याचे संकेत मिळत आहेत.



एकलासपुर येथे बांधण्यात आलेल्या वाकद संग्राहक तलावाच्या मुख्य नाल्यावर शेलुखडसे येथील शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत. सदर तलावाच्या बॅकवॉटर फुगवतट्यामुळे नाल्याच्या पैलतीरावर जाण्यासाठीचा वहीवाटीचा रस्ता नेहमीकरिता संपूर्णतः पाण्याखाली बुडालेला असतो. त्यामूळे गेल्या आठ, दहा वर्षांपासून संबंधीत शेतकऱ्यांची मोठी पंचाईत होत आहे. शेतीच्या मशागतीची साधने व हंगामातील शेतमाल याच्या दळणवळणासाठी तात्पुरता लाकडी साकव बांधून धोकादायक प्रवास करावा लागत आहे. शिवाय दररोज ये जा करण्यासाठी सुद्धा मोठी डोकेदुखी होऊन बसली आहे. या बाबत त्रस्त शेतकऱ्यांनी संबंधीत प्रशासनाकडे व लोकप्रतिनिधींकडे अनेक वेळा पाठपुरावा केला आहे. परंतू संबंधीतांनी त्यांच्या मागणीला प्रत्येकवेळी केराची टोपली दाखवली आहे. अखेर त्रस्त शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा बांध फुटला आणि त्यांनी संबंधितांना जलसमाधी आंदोलनाचा इशारा दिला होता. सदर प्रकरणाला गंभीर वळण लागण्याचे संकेत मिळताच पोलीस अधिक्षक वाशिम यांच्या मार्गदर्शनात पोलिसांनी मध्यस्थी करत सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून बुडीत रस्त्यावर पुल बांधून देण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले होते. परिणामी त्रस्त शेतकऱ्यांनी आपले आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात स्थगित केले होते. दिलेल्या आश्वासनानुसार लघु पाटबंधारे विभाग क्र.३ वाशिमचे कार्यकारी अभियंता श्री बोके यांच्या मार्गदर्शनात विभागीय अभियंता श्री चिखलीकर, शाखा अभियंता श्री सारुक, मुख्य लिपिक श्री गाडे, व सहाय्यक कर्मचारी शिरुभाऊ, इंगोले यांच्या टीम कडून पुलाचा कृती आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने मोजमाप करण्यात आले असल्याची माहिती त्रस्त शेतकरी तथा सामाजिक कार्यकर्ते विश्वासराव पाटील खडसे यांनी दिली आहे.यावेळी बुडीत व बाधीत शेतकरी सतीश गुलाबराव खडसे, सतीश दत्तराव खडसे, राजेश खडसे, अनिल खडसे आदींची उपस्थिती होती.

सदर कामाचे मोजमाप करुन, मंजुरीसाठी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांच्याकडे पाठविले आहे . मंजुरात प्राप्त झाली की, कामाला सुरुवात करण्यास सोईस्कर होइल ..!
**चिखलीकर, ( उपविभागीय अभियंता, ल .पा . विभाग )**

**प्रत्यक्ष काम सुरू करणे गरजेचे ...**
पाण्यात बुडालेल्या रस्त्यावर पुल बांधण्यासाठी त्याचा आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने मोजमाप केले जात आहे . ही त्रस्त शेतकऱ्यांसाठी समाधानाची बाब ठरली आहे . परंतू असे कित्येक आराखडे तयार होतात आणि मोडून सुद्धा जातात . हे शेतकऱ्यांच्या बाबतीत नेहमीच घडत असल्याचे अनेक उदाहरणे सर्वश्रुत आहेत . त्यामूळे केवळ मोजमाप करुन न थांबता प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणे खुप गरजेचे आहे, असे त्रस्त शेतकरी बोलत आहेत .

# अलाहाबाद विद्यापीठाच्या हॉस्टेलमध्ये बाँब बनवताना स्फोट

## स्फोटात दोन विद्यार्थी जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**अलाहाबाद :** विद्यापीठाच्या वसतिगृहात स्फोट झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. वसतिगृहात राहणारा एक विद्यार्थी आपल्या खोलीत बॉम्ब बनवत असताना हा प्रकार घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. यावेळी झालेल्या स्फोटात दोन विद्यार्थी जखमी झाले आहेत. मुख्य आरोपीची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे. विद्यापीठात घडलेल्या या प्रकारानंतर परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेचा पुढील तपास केला जात आहे.

संबंधित घटना बुधवारी सायंकाळी घडली. अलाहाबाद विद्यापीठात शिक्षण घेणारा एक विद्यार्थी वसतिगृहाच्या खोलीत कथितपणे बॉम्ब बनवत होता. यावेळी त्याच्या हातात स्फोट झाल्याने तो गंभीर जखमी झाला, असं पोलिसांनी सांगितले. संबंधित विद्यार्थी हा बॉम्ब का बनवत होता? याबाबतची कोणतीही माहिती अद्याप कळू शकली नाही. प्रभात यादव असे आरोपी विद्यार्थ्याचे नाव असून तो अलाहाबाद विद्यापीठात एमएचं शिक्षण घेत आहे. घटनेच्या दिवशी तो पीसी बॅनर्जी वसतिगृहातील त्याच्या खोलीत बॉम्ब बनवत होता. यावेळी स्फोट झाला आणि त्याच्या उजव्या हाताला गंभीर दुखापत झाली, अशी माहिती शिवकुटीचे सहाय्यक पोलीस आयुक्त राजेश कुमार यादव यांनी दिली. या घटनेनंतर आरोपीला गंभीर अवस्थेत एसआरएन रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेत आणखी एका विद्यार्थ्याला किरकोळ दुखापत झाली आहे. याप्रकरणी आरोपी प्रभात यादवविरुद्ध लवकरच गुन्हा दाखल करण्यात येईल, असेही एसीपींनी सांगितले.

# खासदार डेरेक ओब्रायन यांचे राज्यसभेतून निलंबन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** दोन तरुणांनी लोकसभेच्या मुख्य सभागृहात शिरून सुरक्षाभंग केला आहे. या प्रकरणानंतर देशभर खळबळ उडाली. यावरून आता विरोधक आक्रमक झाले आहेत. संबंधित प्रकरणावर संसदेच्या सभागृहात चर्चा करावी, अशी मागणी विरोधीपक्षाच्या खासदारांकडून करण्यात आली. यावेळी सभागृहात झालेल्या गदारोळानंतर तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओब्रायन यांना राज्यसभेतून निलंबित करण्यात आले आहे. गुरुवारी राज्यसभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधीपक्षाच्या खासदारांनी संसदेच्या सुरक्षाभंगावर चर्चा करावी, अशी मागणी लावून धरली. सुरक्षेच्या उल्लंघनाबाबत चर्चा करण्यासाठी विरोधी खासदारांनी कामकाज स्थगित करण्याची मागणी केली. यासाठी २८ नोटिसा पाठवल्या. पण राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी संबंधित नोटीस नाकारली. यानंतर विरोधी पक्षाच्या खासदारांनी सभागृहाच्या समोरील बाजूस येत गदारोळ केला.

# वकील संघाचा पुढाकार; मराठा आंदोलकांचे खटले मोफत लढवले

## पारडी येथील चौघांना जामीन मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी सुरू असलेल्या आंदोलनात मराठा बांधवांवर गुन्हे दाखल करण्यात आलेल्या सर्व मराठा आंदोलकांचे खटले मोफत लढवणार असल्याचा लोहा-कंधार अभिव्यक्ता संघाने महत्वपूर्ण निर्णय घेतला होता. त्यात दि.(१४) रोजी लोहा तालुक्यातील पारडी येथील चौघांना सत्र न्यायालयातून जामीन मंजूर करण्यात आला. सदर जामीन मंजूर करून देणाऱ्या वकील बांधवांचे सकल मराठा समाजाच्या वतीने सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

मराठा समाजाला हक्काचे आरक्षण मागणीसाठी सकल मराठा समाजाच्या वतीने अतिशय शांततेत,सनदशीर व कायदेशीर मार्गाने आंदोलन करूनही पारडी येथील चौघांवर अनुक्रमे १) दिगंबर नामदेव डिकळे २) संभाजी भुजंगा डिकळे ३) माधव राम डिकळे ४) सुर्यकांत पंढरी पवार यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले होते.तत्पूर्वी सर्व जाती धर्मातील वकील बांधव लोहा कंधार अभिवक्ता संघाच्या वतीने आंदोलनकर्त्यांवरील सर्व केसेस मोफत लढवणार असल्याचा शब्द देऊन सदर उपोषणात आंदोलनकर्त्यांना पाठींबा दिला होता."बोले तैसा, चाले"... या उक्तीप्रमाणे अभिवक्ता संघ लोहा कंधार यांनी मराठा आंदोलकांचे खटले मोफत लढवणार हा वकील संघटनेचा महत्त्वपूर्ण निर्णयावर वकिल संघ ठाम राहून त्यांनी निःशुल्क काम करून न्यायालयातून जामीन मंजूर केला. यामध्ये ऍड प्रफुल्ल शेंडगे, ऍड. नवनाथ वरपडे, ऍड जे वाय पठाण, ऍड. सतीश पाटील, ऍड विशाल भुते,ऍड विष्णुकांत चव्हाण, ऍड अरविंद मोटरवार ,ऍड दासरे, ऍड. डि. ही. केंद्रे ,ऍड बि एम गोरे यांनी सत्र न्यायालयातून जामीन मंजूर करून देणाऱ्या लोहा व कंधार येथील वकील बांधवांवर समाजाच्या वतीने कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.

# शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी उपाययोजना राबवाव्या लागतील

## आमदार बबनराव लोणीकर

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** मराठवाडा विभागात गेल्यावर्षी सततचा पाऊस व अतिवृष्टी आणी वादळ वारा व गरपीट झाल्याने शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे आणी फळबागा चे प्रचंड नुकसान झाले होते. द्राक्ष केळी पपईच्या फळबागा पूर्णपणे उध्वस्त झाल्या होत्या. शेतकरी बांधवांनी शेतीच्या पीक उत्पादनासाठी केलेला खर्चही निघाला नव्हता. आणी त्यातच या ही वर्षी मराठवाडा विभागातील संपूर्ण महसूल मंडळात अतिशय कमी प्रमाणात पाऊस झाला आणी त्यातच सरासरी 20 ते 30 दिवसाचा पावसाचा खंड होता. पाऊस न झाल्यामुळे ओढ नदी नाल्यास विहिरी कोरड्या टाक पडल्या आहे. खरिपाची दुबार पेरणी करावी लागली थोड्याफार प्रमाणात आलेली पिक हरीण रोही व रानडुकराच्या कळपाने उध्वस्त केली मराठवाड्यातला शेतकरी बांधव यामुळे खूप परेशान असून शेतकरी बांधव आर्थिक संकटात सापडला आहे खाजगी सावकारांचे बँकांचे कर्ज शेतकऱ्यांना परत करणे शक्य होत नाही आहे. यामुळे मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांमध्ये आत्महत्येचे प्रमाण प्रचंड वेगाने वाढू शकत. मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायचे असतील तर शेतकऱ्यांना सिंचनासाठी आवश्यक पाणी सुरळीत 24 तास वीज शासन स्तरावरून उपलब्ध करून द्यावी लागेल तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या कार्यकाळात शेतीसाठी राबविलेला योजना त्या अधिक गतीने प्रभावीपणे मराठवाड्यात राबवाव्या लागतील मागील त्याला शेततळे सिंचन विहिरी याकरिता मोठ्या प्रमाणावर निधी उभारावा लागेल मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी शेतीच्या वापरासाठी सुरळीत 24 तास वीज किती दिवसात मिळेल असा तारांकित प्रश्न राज्याची माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी नागपूर येथे चालू असलेल्या हिवाळी अधिवेशनात उपस्थित केला असता कृषिमंत्री धनंजयजी मुंडे यांनी आमदार लोणीकरांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले की शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता राज्य सरकार कटीबद्ध असून तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या कार्यकाळात त्यांनी व्यापक दृष्टिकोनातून चालू केलेल्या सर्व योजना सरकार प्रभावीपणे राबवत असून यापुढे सर्व योजनांची अंमलबजावणी अधिक गतीने करण्याच्या सूचना शासन स्तरावरून देण्यात येईल आवश्यक त्या बाबींकरिता भरघोस निधीची तरतूद करून शेततळे व सिंचनाच्या विहिरीसाठी व्यापक मोहीम महाराष्ट्रभर राबवली जाईल.




दहावे पुण्यस्मरण

सुरू आहे वाटचाल तुमच्या आशीर्वादाने, जीवन पथावर चालत राहू
तुमच्या आदर्श संयमाने, सदैव जपतो आम्ही तुमच्या आदर्शवत स्मृतीला

स्व. बाजीराव गाडेकर

15 डिसेंबर 2023

शोकाकूल

शोभाबाई बाजीराव गाडेकर (पत्नी)
सागर बाजीराव गाडेकर (मुलगा)
दीपक बाजीराव गाडेकर (मुलगा)
राहुल बाजीराव गाडेकर (मुलगा)
श्रेया, स्वरा, देविका, साई गाडेकर (नातू)
खुलताबाद रोड, देवगिरी कारखाना, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

## काँग्रेसला कानपिचक्या

आधुनिक केसरी

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल आगामी लोकसभा निवडणुकांसाठी मार्गदर्शक ठरल्याचं भाजपाकडून सांगितलं जात आहे. मात्र, दुसरीकडे विरोधकांकडून या राज्यांमध्ये भाजपाने मिळवलेल्या विजयाचा संदर्भ थेट देशाच्या निवडणुकांसाठी घेता येणार नाही, अशी भूमिका मांडली आहे. या पार्श्वभूमीवर देशातील दोन प्रमुख राष्ट्रीय पक्ष असणाऱ्या भाजपा व काँग्रेस यांच्यातील राजकीय लढाई पुढील काही महिन्यांत अधिकाधिक तीव्र होताना पाहायला मिळू शकते. यासंदर्भात ठाकरे गटानं आता भाजपाच्या एकूण धोरणावर भाष्य करताना काँग्रेसलाही कानपिचक्या दिल्या आहेत.राजस्थान, मध्य प्रदेश व छत्तीसगड या तीन राज्यांमध्ये भाजपानं पूर्ण बहुमताच्या आधारावर सरकार स्थापन केलं आहे. त्याचा संदर्भ देत सामना अग्रलेखातून भाजपावर टीका करण्यात आली आहे. “मध्य प्रदेशात शिवराजसिंह चौहान व राजस्थानात वसुंधराराजेंनाही महत्त्व दिले नाही. तेव्हाच नक्की झाले होते की, तेथील निवडणुकांचे निकाल हवे तसे लावले जातील व शिवराजसिंह चौहान, वसुंधराराजे यांचे काटे दूर करून भाजपचे नियंत्रण ‘शत प्रतिशत’ आपल्या हाती घेतले जाईल. अखेर तसेच घडले आहे”, अशा शब्दांत अग्रलेखातून भाजपाच्या धोरणावर बोट ठेवण्यात आलं आहे. हा भारतीय जनता पक्षाचा अंतर्गत मामला आहे आणि कुणाला काय करायचे व काढायचे ते त्यांचे हायकमांडच ठरवू शकते. मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगढचे मुख्यमंत्री हे लोकनेते वगैरे नाहीत. त्यामुळे गेल्या दहा वर्षांत ज्या पद्धतीने राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यपाल या पदांवर बिनचेहऱ्याचे लोक नियुक्त केले गेले. तेच धोरण आता मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत राबविले जात आहे. जुन्यांना घरी बसवून नवे नेतृत्व, जे आपल्या कह्यात राहील, अशांना मुख्यमंत्रीपदी बसवले जात आहे”, असा दावा ठाकरे गटानं केला आहे. महाराष्ट्रात शिवसेना-भाजप एकत्र असताना शिवसेनेस उपमुख्यमंत्रीपद देण्याची वेळ आली की, उपमुख्यमंत्रीपद आमच्या धोरणात बसत नाही असे सांगणारे आता एकेका राज्यात दोन-दोन उपमुख्यमंत्री नेमताना दिसतात. महाराष्ट्र राज्यातच दोन उपमुख्यमंत्री नेमले आहेत. प्रचंड बहुमत मिळाल्याने जुन्या-जाणत्या प्रस्थापितांना घरी बसवून मार्गदर्शक बनवायचे. हेच धोरण भाजपमध्ये सध्या राबविले जात आहे”, अशी टीकाही ठाकरे गटानं केली आहे. काँग्रेसने या घडामोडींकडे डोळसपणे पाहायला हवे. राज्याराज्यांतील वतनदार, सुभेदारांना हात लावण्याची हिंमत काँग्रेसमध्ये नाही. मध्य प्रदेशातील निवडणूक पूर्णपणे कमलनाथांच्या भरवशावर होती.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

## संसदेवर हल्ला : सुरक्षेवर प्रश्न!

आधुनिक केसरी

**संसदेवरील हल्ल्याच्या वर्षपूर्तीनिमित्त पुन्हा एकदा संसदेच्या सुरक्षेत कुचराई झाली आहे. १३ डिसेंबर २०२३ रोजी लोकशाही मंदिरातील कामकाजादरम्यान, दोन व्यक्तींनी प्रेक्षक गॅलरीतून अचानक लोकसभेच्या खासदारांच्या जागेवर उडी मारली. मात्र, सुरक्षा कर्मचाऱ्यांनी दोन्ही संशयितांना पकडले. दरम्यान सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले.संसद भवनावर दोन तरुणांच्या अचानक उडी मारण्याच्या घटनेने परत एकदा संसद भवनाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेने २२ वर्षे जुन्या दहशतवादी घटनेची पुन्हा एकदा आठवण करून दिली.**

जेव्हा पाकिस्तानी दहशतवाद्यांनी १३ डिसेंबर २००१ रोजी भारतीय संसदेच्या संकुलावर हल्ला केला होता आणि गोळ्यांच्या सरींनी देश होरपळला होता.

लोकशाहीच्या मंदिराला लक्ष्य करण्यात आले. लष्कर -ए-तैयबा आणि जैश-ए-मोहम्मदच्या पाच दहशतवाद्यांनी १३ डिसेंबर २००१ रोजी लोकशाहीच्या मंदिराला लक्ष्य केले होते. या हल्ल्यात नऊ जणांना आपला जीव गमवावा लागला होता. शहीद झालेल्यांमध्ये सहा दिल्ली पोलिस कर्मचारी, दोन संसद सुरक्षा सेवेचे कर्मचारी आणि एका माळीचा समावेश आहे. त्याचवेळी हल्ला करण्यासाठी आलेले दहशतवादी मारले गेले. संसदेत हिवाळी अधिवेशन चालू होते.संसदेत हिवाळी अधिवेशन चालू होते. काही मुद्द्यावरून पक्ष आणि विरोधकांमध्ये प्रचंड गदारोळ झाल्यानंतर दोन्ही सभागृहांचे कामकाज तहकूब करण्यात आले. कामकाज तहकूब होऊन सुमारे ४० मिनिटे उलटून गेली होती. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, विरोधी पक्षनेत्या सोनिया गांधी यांच्यासह अनेक खासदार निघून गेले होते. मात्र, उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी आणि संरक्षण राज्यमंत्री हरिन पाठक यांच्यासह १०० हून अधिक खासदार आत उपस्थित होते. दरम्यान, संसदेबाहेर झालेल्या गोळीबाराने केवळ संसदच नाही तर संपूर्ण देश हादरला होता. देशातील लोकशाहीच्या सर्वात मोठ्या मंदिरावर दहशतवाद्यांनी हल्ला केला होता.



दहशतवादी एका कारमधून आले होते.

१३ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११.४५ च्या सुमारास गृह मंत्रालयाचे स्टिकर असलेली ॲम्बेसेडर कार संसद भवनात घुसली होती. त्यात जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबाचे पाच दहशतवादी बसले होते, तोपर्यंत सुरक्षा दलांना याची माहिती नव्हती. मुख्य इमारतीकडे जात असताना दहशतवाद्यांचे वाहन चुकून उपराष्ट्रपतींच्या ताफ्यासमोर आले. घाबरलेल्या स्थितीत त्यांची कार ताफ्यातून प्रवास करणाऱ्या सुरक्षा वाहनाला धडकली. आता सगळ्यांचे लक्ष त्याच्याकडे लागले होते. यावर दहशतवादी बाहेर आले आणि त्यांनी अंदाधुंद गोळीबार सुरू केला. उपराष्ट्रपतींचे रक्षक आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांनी प्रत्युत्तर दिले. तत्काळ संपूर्ण कंपाऊंडचे दरवाजे बंद केले. प्रत्येकजण पळून जाण्यासाठी कोपरा शोधत होता.दहशतवाद्यांना प्रथम केंद्रीय राखीव पोलीस दल कॉन्स्टेबल कमलेश कुमारी यांनी पाहिले. त्याने आवाज करून सर्वांना सावध केले. धोका लक्षात घेऊन दहशतवाद्यांनी कुमारीला गोळ्या झाडल्या. आता संसद भवन रणांगण बनले होते. दोन्ही बाजूंनी गोळ्या झाडल्या जात होत्या. कॅम्पसच्या आत आणि बाहेर गोंधळाचं आणि दहशतीचं वातावरण होतं, प्रत्येकजण सुटण्यासाठी कोपरा शोधत होता. मंत्र्यांना सभागृहाच्या आत सुरक्षित स्थळी नेण्यात आले.दहशतवादी

इमारतीत प्रवेश करू शकतील अशी भीती सुरक्षा कर्मचाऱ्यांना वाटत होती. त्यामुळे सर्वप्रथम तत्कालीन गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी आणि संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांच्यासह सर्व ज्येष्ठ मंत्र्यांना तातडीने सभागृहात सुरक्षित स्थळी नेण्यात आले. इमारतीत जाणारे आणि बाहेर जाणारे सर्व दरवाजे बंद होते. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी पटकन आपापल्या पोझिशन तयार केल्या आणि ग्रेनेड आणि गोळ्यांच्या दरम्यान सर्व संधी घेण्यास सुरुवात केली.

सुरक्षा जवानांनी पाच दहशतवाद्यांना ठार केले. पाच दहशतवाद्यांनी आपली जागा बदलण्यास सुरुवात केली. आतमध्ये घुसून काही नेत्यांना इजा पोहोचावी यासाठी दहशतवादी सभागृहाच्या दारापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत होते. मात्र सुरक्षा दलाच्या जवानांनी सर्व दरवाजांभोवती आधीच आपले स्थान तयार केले होते.

पाचही दहशतवाद्यांना ठार करण्यात सुरक्षा दलांना यश आले. एका दहशतवाद्याने आत्मघाती वेस्ट घातला होता. जेव्हा त्याला गोळी घातली गेली तेव्हा सुसाईड वेस्टमध्ये स्फोट झाला. हमजा, हैदर उर्फ तुफैल, राणा, रणविजय आणि मोहम्मद अशी या पाच दहशतवाद्यांची नावे आहेत. संपूर्ण ऑपरेशनला ४० मिनिटे लागली.

१३ डिसेंबर २००१ रोजी जुन्या संसद भवनावर मोठा दहशतवादी हल्ला झाला होता, त्यानमुळे नवीन संसदेची सुरक्षा व्यवस्था सातत्याने कडक करण्यात आली आहे. हे सर्व पाहता नवीन संसद भवनात सुरक्षा व्यवस्थेची विशेष काळजी घेण्यात आली आहे. नवीन इमारतीत सुरक्षेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान, आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज सुरक्षा दल, अग्निशमन यंत्रणा यासह अनेक व्यवस्था करण्यात आल्या आहेत. नव्या संसदेची सुरक्षा सध्याच्या इमारतीपेक्षा कितीतरी पटीने चांगली असताना संसद भवनाच्या इमारतीत दोन तरुणांनी प्रवेश कसा केला.? त्यांना पास कोणी दिली.. प्रवेश द्वारावर अभ्यद्य अशी सुरक्षा असताना त्यांनी प्रवेश कसा केला.? त्यांच्या हातात डबा होता. सुरक्षा रक्षकांनी डब्ब्याचे निरीक्षण केले नाही का? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतात . विशेष म्हणजे डब्ब्यातून धूर बाहेर निघत असल्याचे समोरं आले आहे.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## निष्ठा आचरणात असली पाहिजे

आधुनिक केसरी

**समर्पण भक्ति,अथवा निस्वार्थ भावनेने एखाद्याच्या प्रति असलेली धारणा सर्वसाधारण पणे या पद्धतीने निष्ठा समजली जाते. निष्ठा हि दाखविण्यासाठी नसुन ती आचरणात असली पाहिजे. बोलण्या असणारी निष्ठा हि कृतीशील नसेल तर ती पोकळ असते.आचरणात निष्ठा आहे तो खरा निष्ठावंत असतो.सध्या निष्ठा हि कठिण तपस्या झाल्याने निष्ठेची अपेक्षा कोणाकडून हि करणं उचित नाही. आज काल तर प्रत्येकजण मी किती निष्ठावंत आहे हे दाखवण्याचा प्रयत्न करताना पण सार्वजनिक पातळीवर पाहतोय.पण बहुतांश प्रत्येकाची निष्ठा हि फक्त शब्दात म्हणजे बोलण्यापुरतीच आहे हेच सध्याच वास्तव आहे.पण निष्ठा हि शब्दात बोलण्यात नाही तर आचरणत असली पाहिजे.**

इतिहासाची पानं उघडून त्यामध्ये थोडं डोकावुन अवलोकन करून पाहिल्यानंतर एकनिष्ठतेच महत्व समजत.त्याच बरोबर सत्युग,त्रेतायुग,द्वापारयुग ,या कालखंडातील समाज जीवन अध्यान केल्यानंतर लक्षात येईल एकनिष्ठता हि एक तपसाधना आहे. आणि ती त्या काळी बोलण्यात नाही तर आचरणात होती .म्हणुन त्या काळाची एक वेगळी व आदर्श ओळख निर्माण झाली. सध्याच्या काळात अचारणत नाही तर बोलण्यात एकनिष्ठता वाढलीअसून कृतीत शुन्य असल्याचं सर्वसमावेशक पणे आपल्याला सगळीकडे दिसतंय.महणून प्रत्येका मध्ये एकनिष्ठता दिसण शक्य होणार नाही.पण प्रत्येकाने अचारणत एकनिष्ठ असावं अशी आपेक्षा करणं गैर नाही. पण असं दिसण अवघडच आहे हे कटु आहे पण सत्य आहे.तपस्या हि साधना असते आणि साधना हि सहजा सहजी यशस्वी होत नसते. म्हणून एकनिष्ठता हि एक प्रकारची साधनाच आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.हि साधना सृष्टीवरील अंत्यत कमी नाममात्र लोकांकडून पुर्ण होऊ शकते. हे आपलं दुर्भाग्य तर आहेच त्याच बरोबर खेदाचीच बाबा आहे.वास्तविक प्रत्येक व्यक्ती मध्ये एकनिष्ठता हि महान तपस्या निर्माण झाली पाहिजे.किंवा अचारणत एकनिष्ठता आली पाहिजे.त्यासाठी आध्यत्मिक ज्ञान मार्ग अवलंबला पाहिजे. खरंच असं घडलं तर आपला वैचारिक प्रवास एक नवी दिशा धारण केल्याशिवाय राहणार नाही.या मध्ये शंका कुशंका अजिबात नाही. जगाच्या पाठीवरील सगळे डावपेच वापरून सुद्धा ज्याच मन बुद्धी तीळमात्र विचलित होत नाही तो एकनिष्ठ आणि या युगात कृती शील एकनिष्ठ असणं म्हणजे सर्वसाधारण बाब नसुन ते कठिण तपस्या आहे.आणि म्हणूनच एकनिष्ठ आचरण करण हि आपेक्षा कोणाकडूनही करू नये कारण तपस्या हि कोणाकडूनही पुर्ण होऊ शकत नाही. अपवादात्मक लोकच हि तपस्या आपल्या जीवनात सार्थ पणे पुर्ण करू शकतात. असे लोक खुप कमी आहेत हेच या युगाच दुर्भाग्य आहे . मोजक्या लोकांच्या कडे ही तपसाधान असल्याचं दिसुन येत. शब्द आणि आचरण या मध्ये अंतर नसणं नफा , काय ,तोटा काय, हित, अहित या साठी आपल्या शब्दात आणि अचारणात अंतर पडणार नाही याची काळजी दक्षता घेणं याच बरोबर स्वार्थ जागा झाला म्हणून दिशा बदलणार नाही.महणजे निष्ठा असुन हा निष्ठा मार्गावरील प्रवास करताना कधी कधी खडतर होऊ शकतो.पण खडतर प्रवासात सुद्धा जो आपल्या इमानाशी प्रतारणा करत नाही. लाखोंची काय तर कोट्यवधी ची धन संपदा वापरून आपण ज्याचं मन परिवर्तित करू शकत नाही. जिथं,लबाडी बेईमानी, गद्दारी ,फसवणूक, हे अवगुण शोधून सापडणार नाहीत.अस उदारमतवादी आचरण म्हणजे एकनिष्ठता.प्रत्येक व्यक्तिच एक सर्वसाधारण असं मत असतं.आपल्या जीवनात वेगवेगळ्या कारणांनी आपल्या संपर्कात आलेल्या व्यक्ती ह्या आपल्याशी प्रमाणिक एकनिष्ठ राहिल्या पाहिजेत हि एक साधारण आपेक्षा धारणा असते. परंतु एकनिष्ठता हि एवढी सर्वसाधारण गोष्ट नाही कि ती प्रत्येक व्यक्ती कडुन तीच पालन आचरण होईल असं होणार नाही.याचं कारण हि तसंच आहे. आपेक्षा सगळ्यांना आहे.जीवनात अनेक लोक वेगवेगळ्या कारणांनी आपल्या संपर्कात येणार खोटी स्तुती करणार स्वतःचा लाभ करून घेणार आणि नंतर शेवटी दोषारोप करून टिका टिप्पणी करून दुर होणार हे सध्याच वर्तमान जग आहे. सगळेच लोक असे आहेत असं नाही याला सुद्धा काही लोक अपावाद आहेत.आणि तेच लोक एकनिष्ठ असतात एकनिष्ठता हि तपस्या आहे ज्या मध्ये कुठलिही अपेक्षा नसते . महत्वकांक्षा ,नसते छुपा अजेंडा नसतो.असती ती फक्त प्रमाणिक धारणा ज्याच्या विषयी आपण एकनिष्ठ आहेत. त्याच उत्तरोत्तर कल्याण झाल पाहिजे नाव लौकीक झालं पाहिजे एवढाच प्रमाणिक भाव असतो. निस्वार्थी आपुलकी असते.आपले पणा त्यागाची वृत्ती असते.स्वार्थाचा लवलेष गंध अजिबात नसतो. महणुन एकनिष्ठता हि सरळ साधी सोपी गोष्ट नाही तर ती एक तपस्या आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पहूर महावितरण विभागाचा नवीन भ्रष्टाचार उघड

## माहिती अधिकारात मागितलेली माहिती जाणीवपूर्वक लपवली

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** दि.20.10.2023.रोजी महावितरण विभाग भुसावळ या कार्यालयाला केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती अधिकार कार्यकर्ता तथा पत्रकार प्रविण विजय तायडे यांनी काही माहितीची मागणी माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये अर्ज देऊन केली होती. ती माहिती जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता पहूर यांनी सबंधित शेंदुर्णी कक्ष अभियंता यांना वाचवण्यासाठी मागितलेली महत्वाची माहिती न देता, दिशाभूल करणारी अपुर्ण माहिती दिली.

सदर दिलेली दिशाभूल करणारी माहिती अशी की, जुन महिन्यामध्ये पाचोरा शेंदुर्णी वाकडी स्टेट हायवे साठी पब्लिक वर्क डिपार्टमेंट यांच्या कामासाठी संत सत्रमदास इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांनी 1.3% या द्वारे कामाची मंजुरी मिळवल्याची माहिती दिली, व या माहिती नुसार सदर ठिकाणी पडताळणी केली असता,त्या ठिकाणी 11/कि.व्हो.विद्यूत वाहिनीचे नवीन खांब बघायला मिळतात मात्र नवीन विद्यूत तारा बघायला मिळत नाहीत व सुरक्षेच्या दृष्ठिकोनातून वापरण्यात येणारी गार्डिंग देखील त्या ठिकाणी नसल्याचे समोर आले, हा सर्व प्रकार बघून शेंदुर्णी पहूर विभागात कागदावर नियमाने दिसणारे कामे देखील प्रत्यक्षात बेकायदेशीर होत असल्याचे चित्र समोर येत आहे,व आपल्याच भ्रष्टाचारी अधिकाऱ्याला वाचवण्यासाठी स्टेट हायवे चे मंजुरीचे पत्रक जे की स्टेट हायवे पासून पंधरा मिटर अंतरापर्यंत मर्यादित असते त्याचा नगर पंचायत हद्दीतील मागितलेल्या माहिती मध्ये तिळमात्र सबंध येत नाही, ती माहिती अशा अधिकाऱ्याला वाचवण्यासाठी दिली जाते जो अधिकारी कामावर हजर राहत नाही नागरिकांच्या समस्याकडे दुर्लक्ष करतो व हजेरी बुकात एकाच वेळेला आठ दहा दिवसाच्या हजेरी भरून घेतो व त्याच्या वरिष्ठाचे इतरांवर लक्ष असते मात्र या व्यक्तीवर लक्ष राहत नाही या अधिकऱ्याला वाचवण्यासाठीच वरिष्ठ अधिकारी माहिती अधिकारात दिशाभूल करणारी माहिती पुरवत असेल तर हा संपूर्ण प्रकार बघता या गोष्टीला पहूर उप विभागाचे अधिकारी तर खत पाणी घालत नाहीत ना? असा ही प्रश्न या ठिकाणी उपस्थित होताना बघायला मिळत आहे.

या महावितरण विभागातील ही भ्रष्टाचाराची साखळी अजून लांब आहे.? हा देखील चौकशीचा भाग असून सबंधित महावितरणाचे वरिष्ठ अधिकारीच एकमेकांना वाचवत असल्याचे समोर येत असून,पहूर उप विभागातील एकूण कामांची चौकशी करणे गरजेचे ठरत असल्याने, माहिती अधिकार कार्यकर्ते तथा पत्रकार प्रविण विजय तायडे हे महावितरण विभागाचे मुख्य कार्यालय प्रकाशगड या कार्यालयाशी पत्र व्यवहार करणार असून गरज पडल्यास न्यायालयात देखील जाणार असल्याची माहितीही, माहिती अधिकार कार्यकर्ते तथा पत्रकार प्रविण तायडे यांनी वृत्तपत्रांशी बोलताना दिली.

# सिंघम अधिकारी समीर वानखेडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप



आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** आयआरएस आयुक्त पदावर कार्यरत असलेले बहुचर्चित सिंघम अधिकारी समीर वानखेडे यांच्या वाढदिवसा निमित्त तालुक्यातील सवड येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विध्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. बॉलिवूड जगतात धडधडी निर्माण करणारे व भ्रष्टाचाऱ्यांचे कर्दनकाळ म्हणुन अल्पावधीतच नावारूपास आलेले सिंघम अधिकारी समीर वानखेडे यांची वाशिम जिल्हयातील रिसोड तालुका जन्मभूमी आहे. त्यामूळे आपसुकच जिल्ह्यात त्यांचा खुप मोठा चाहता वर्ग आहे. शिवाय त्यांचे विचार देशभर पोहचावे म्हणून 'समिर वानखेडे विचारमंच' सुद्धा राज्यात कार्यरत आहे. त्याच माध्यमातून विचारमंचचे सरचिटणीस विजय पंडीत व इतर पदाधिकारी यांनी वानखेडे यांच्या वाढदिवसा निमित्त शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिसोड बाजार समितीचे संचालक भगवानराव गाडे होते.तर डॉ. विजय प्रसाद तिवारी, अमोल नरवाडे, मंचकराव देशमुख, विनोद पाटील खडसे, गजानन काकडे, शिवराज पंडीत, रमेश पंडीत आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सवड येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक श्री सपकाळ यांनी केले.दरम्यान आयोजक म्हणून शालीक पवार, ज्ञानेश्वर लांडकर, सचिन काकडे, जयदीप पंडीत, सचिन वाकोडे, नंदु कांबळे, स्वप्निल खांदळे, किशोर वाकळे, आश्रूजी जुमडे, गजानन पडघान, प्रतिक पंडीत यांच्यासह, युवा एकता ग्रुप सवडचे सर्व सदस्य उपस्थीत होते.



# नेर गटाचे जि.प.सदस्य आनंदराव पाटील यांचे शैक्षणिक क्षेत्रात ऐतिहासिक कार्य

## खंडलाय खु. येथे 3 नवीन वर्ग खोल्यांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**धुळे :** नेर येथील जिल्हा परिषद सदस्य श्री आनंदराव पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून नेर जिल्हा परिषद गटात विकास कामांचा धडाका सुरूच असून त्यांच्या प्रयत्नाने खंडलाय खुर्द येथे 27 लाख रुपये खर्चातून जि. प.मराठी शाळेच्या तीन नवीन वर्ग खोल्यांचे बांधकाम करण्यात येत आहे. या वर्ग खोल्यांचे भूमीपूजन दि.12 डिसेंबर रोजी जि.प.सदस्य आनंदभाऊ पाटील यांच्या हस्ते पार पडले. धुळे ग्रामीणचे आमदार बाबासाहेब कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली नेर जिल्हा परिषद गटाचे कार्यशील जि. प. सदस्य आनंदभाऊ पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून या जि. प. गटांमध्ये विविध विकासाची कामे केली जात आहेत. विकास कामांची घोडदौड कायम सुरू ठेवत त्यांनी प्रत्येक गावात मूलभूत विकासाच्या कामाला प्राधान्य दिले आहे. जि.प. गटातील विविध गावांमध्ये गावांतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण,कॉंक्रीट गटारीचे बांधकाम, बैठक व्यवस्थेची सिमेंट बाकडे, पथदिवे असे विविध विकासाची कामे केली जात आहेत.

दरम्यान श्री आनंदभाऊ पाटील हे नेर जि.प. गटाअंतर्गत येणाऱ्या प्रत्येक गावातील नागरिकांच्या वैयक्तिक संपर्कात राहून वैयक्तिक लाभाच्या योजनांचाही लाभ त्यांना मिळवून देत असतात. दरम्यान जि.प. सदस्य आनंदभाऊ पाटील यांच्या प्रयत्नाने शिक्षण विभागामार्फत खंडलाय खुर्द येथे जिल्हा परिषद मराठी शाळेत तीन नवीन वर्ग खोल्यांचे बांधकाम करण्यात येत आहे. या वर्ग खोल्यांसाठी जि.प.सदस्य आनंदभाऊ पाटील यांनी एकूण 27 लक्ष रुपये मंजूर केले आहेत. या वर्ग खोल्यांचे भूमीपूजन मंगळवार दिनांक 12 डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यात आले. या नवीन वर्ग खोल्यांमुळे विद्यार्थी व शिक्षकांची निर्माण होणारी शैक्षणिक अडचण दूर होणार आहे.खंडलाय खुर्द गावात शैक्षणिक क्षेत्रात ऐतिहासिक काम केल्यामुळे येथील ग्रामस्थांनी श्री आनंदभाऊ पाटील यांचे आभार मानले. या भूमिपूजन प्रसंगी जि.प सदस्य श्री आनंदराव पाटील, सरपंच पूनम बोरसे, पी. एन. पाटील, हिम्मत पाटील, दिनेश पाटील, अमोल पाटील, युवराज शिवाजी पाटील, युवराज दौलत पाटील, राजधर पाटील, नाना पाटील, शंकर पाटील, मल्हार पाटील, संदीप बोरसे, सतीश पाटील, संजय पाटील, भटू पाटील, रतीलाल पाटील, निंबा पाटील, माधवराव पाटील त्यासोबत जि. प. शिक्षक राजधर पाटील, जि. प. शिक्षिका संध्या सूर्यवंशी, अनिता सोबवणे यांच्यासह सर्व ग्रामस्थ व पदाधिकारी उपस्थित होते.

# नाताळ सणानिमित्त बाजारपेठ सजली

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** नाताळ अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून मुंबईतील ठिकठिकाणच्या बाजारपेठा सजावटीच्या साहित्यांनी सजल्या आहेत. नाताळनिमित्त लागणाऱ्या सजावटीच्या विविध वस्तूंनी दुकाने सजली आहेत. बाजारांमध्ये सजावटीच्या वस्तूंच्या खरेदीसाठी गर्दी होऊ लागली आहे. ख्रिसमस ट्री, ख्रिस्त जन्माच्या देखाव्यासाठी गोठे, मुखवटे, सांताक्लॉजची टोपी इत्यादी साहित्याला ग्राहकांकडून मोठी मागणी आहे.दरवर्षी मुंबईसह सर्वत्र नाताळ मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. ख्रिस्ती बांधवांची घरे, प्रार्थनास्थळे आकर्षक रोषणाईने उजळून निघतात. त्याचबरोबर ख्रिस्तजन्माचा देखावा सर्वांचेच आकर्षण ठरते. दरम्यान, बाजारात बच्चे कंपनीचे खास आकर्षण असलेल्या सांताक्लॉजच्या विशिष्ट टोप्यांसोबतच यंदा हेडबॅंड्सनाही पसंती मिळत आहे. ग्राहक या आकर्षक टोप्या मोठ्या प्रमाणात खरेदी करीत आहेत. तसेच सजावटीसाठी आवश्यक असणाऱ्या शोभेच्या वस्तूंचीही मोठी खरेदी केली जात आहे. लहान मुलांच्या मागण्यांना प्राधान्य देऊन त्याप्रमाणे खरेदी करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. बाजारात लहान – मोठ्या सजावटी दिव्यांना मोठी मागणी आहे. त्यांची किंमत १०० ते ५०० रुपयांपर्यंत आहे, अशी माहिती विक्रेत्यांनी दिली. तसेच भेटवस्तू देण्यासाठी विविध पर्याय बाजारात उपलब्ध आहेत. त्यामध्ये शोभेच्या वस्तू मुख्य आकर्षण ठरत आहेत.तसेच दिव्यांच्या माळा सोडलेल्या विविध आकाराच्या काचेच्या बरण्याही उपलब्ध आहेत. त्याचबरोबर सांताक्लॉजचे चित्र असलेले छोटे कंदील, घंटा, तारा असे आदी उपलब्ध असल्याची माहिती विक्रेते कांती साहू यांनी दिली.

# एक रूपयांत पीक विमा भरा आज शेवटची तारीख

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामाप्रमाणेच रब्बी हंगामातही शासन विम्याचा प्रीमियम शासन भरणार आहे त्यामुळे एक रुपयात रब्बीतही शेतकऱ्यांना पीक विमा काढून घ्यावे; असे आवाहन सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी आज शेवटची तारीख आहे ही डेडलाइन देण्यात आलेली आहे. यंदा बऱ्याच पैकी शेतकरी खातेदार या योजनेमध्ये सहभागी होण्याची शक्यता असल्याचे सोयगाव कृषी विभागाने सांगितले.

नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास रब्बी पिकांना योजनेत संरक्षण मिळते. यंदा जमिनीत आर्द्रता नसल्याने पेरण्यांची मंदगती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना योजनेचा फायदा होऊ शकतो. यामध्ये कर्जदार व बिगर कर्जदार शेतकरी सहभाग ऐच्छिक आहे. खातेदाराने वैयक्तिक कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी योजनेत सहभाग घेऊ शकतात. योजनेत गहू, हरभरा, कांद्यासह इतर पिकांचा समावेश करण्यात आला आहे.योजनेत यावर्षीपासून शेतकरी हिस्सा राज्य शासन भरणा करणार आहे.



# सांस्कृतिक सेतू -लोकवाघ्या

आधुनिक केसरी

**चंपाषष्ठी म्हटले की खंडोबाचा लोकजागर समोर येतो.कारण याच दिवशी खंडोबाने मार्तंड भैरव रुप धारण करून मनी आणि मल्य या दोन क्रूर दानवांचा संहार केला यावेळी चाफ्याच्या फुलांचा खंडोबा देवतावर वर्षाव केला तो दिवस. राज्यातील अद्भुत असा आगळावेगळा चंपाषष्ठी उत्सव केवळ जेजुरीच्या जयाद्री परिसरातच नव्हे तर कर्नाटक, आंध्रसारख्या राज्यात खंडोबा चंपाषष्ठी नावाने साजरा होत असतो. याच खंडोबाचा भक्त आणि लोकसंस्कृतीचा उपासक असलेल्या वाघ्याची खंडोबावरील श्रद्धा, खंडोबाचा दसरा सण त्याच्या अनुपम भक्तीची उपासनेची साक्ष देते.**

धर्म, अर्थ, शास्त्र आणि संस्कृतीने नटलेल्या महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटकाच्या सांस्कृतिक भूमीवर असलेल्या भारतीय लोकदेवता खंडोबाच्या अनेक उपासकांपैकी या तिन्ही राज्याचा पूर्व काळापासून सांस्कृतिक सेतू बांधणारा वाघ्या म्हणजेच चंपाषष्ठीचा मानकरी. वग्ग्या किंवा ओग्ग्या याची विशेष वेशभूषा लोकवाणी आणि भाषेंचे वेगळेपण जरी असले तरी आपली देवता व धार्मिक कार्य सामाजिक भान लक्षात घेऊन ऐक्याचा आणि समानतेचा संदेश आपल्या लोकवाणीतील गायन, नृत्यकला आणि रचनेद्वारे देण्याचे कार्य करताना दिसून येतो. "येळकोट येळकोट' असा खंडोबाच्या नावाचा गजर करत तल्लीन होऊन लोकपारंपरिक नृत्याचा आविष्कार करणारा महाराष्ट्रीयन वाघ्या असो अथवा हाती डमरू, पायी घुंघरू आणि कपाळी भंडारा लावलेला घोंगडीची कफनी घातलेला कन्नड ओग्ग्या असो अथवा डोक्यावर मोरपीस घातलेली घोंगडीची टोपी कफनी डमरू, घंटा, बंडर बट्टेलो (कोटंबा तांब्याचे अथवा पितळी चौकोनी पात्र) हाती पताका आणि त्रिशूळ घेतलेला आंध्र मल्लन्नाचा ओग्ग्या अशा वेगवेगळ्या नावात वेशभूषेत आणि भाषेत जरी असला तरी त्यांचे श्रद्धास्थान एक शिव अवतारीत परंतु खंडोबा, मैलार आणि मल्लन्ना मार्तंड भैरव अशा वेगवेगळया नामरूपात आणि राज्यात दिसून येतो. खंडोबाची सेवा करणा-या वाघ्या-मुरळीची परंपरा ही महाराष्ट्रात आहे असं सर्वसाधारण समजलं जातं. परंतु महाराष्ट्राचा शेजारी कर्नाटक, आंध्र प्रदेशातून ही प्रथा पाहावयास मिळते, यावरून खंडोबाचे भारतीय लोकदेवतांचे अस्तित्व व्यापक असल्याचे दिसून येते. आंध्र, कर्नाटकात मैलार - मल्ल्या - मल्लना या नावाने गाजत असलेला किंवा महाराष्ट्रात मल्हारी - खंडोबा-मार्तंड भैरव - म्हाळसाकांत या नावाने लोकप्रिय झालेला देव अशा वीर परिवाराकरिता प्रख्यात आहे.

वाघ्या व मुरळी या शब्दांच्या व्युत्पत्तीसंबंधी काही कथा - दंतकथा वाघ्या मुरळी समाजात प्रचलित असून त्यांच्या जागरणात यातील काही धार्मिक कथा ही सांगितल्या जातात. मुरळ्यांना आपण तिलोत्तमेपासून आणि वाघ्यांना आपण चंपानगरीच्या राजापासून निर्माण झालो, असे समाधान यात या कथांद्वारे मिळते. वाघ्या या शब्दाचे मळ कन्नड देवाचे दासानुदास, कुत्र्याप्रमाणे प्रामाणिक, एकनिष्ठ भक्त या मूलार्थाचे मराठी अपभ्रष्ट रूप 'वाघा', 'वाघ्या' असे झाले आहे. या संबंधीचे उल्लेख बाराव्या शतकापासून आढळतात. या संदर्भात काही वर्षापूर्वी जेजुरीच्या खंडोबाचे जर्मन उपासक म्हणून ख्यातीप्राप्त झालेले जर्मनी देशातील हंड्ल्बर्ग युनिव्हर्सिटीचे व खंडोबा इतिहासाचे गाढे अभ्यासक कै. डॉ. गुंठूर सोनथ्यामार यांनी वाघ्या-मुरळी या विषयावर कर्नाटक- महाराष्ट्र राज्यातील वग्गय्या यांच्या जीवनमानासंदर्भात लघुपटाची



निर्मिती करून देश-विदेशातील दूरदर्शनवरून प्रसारित केला होता.

आंध्र आणि कर्नाटकच्या सीमालगत भागात असणारे वाघे (ओग्गय्ये) हे बासरी, डमरू वाजवीत डोक्यावरील टोपीवरील मोरपीस हलवीत गिरक्या घेत खंडोबाच्या लोकवाणीतील ओव्या, खंडोबाचे वर्णन गातात हे गवाले समाजाचे असतात.

प्रत्येक घरात सुख-समृद्धी लाभावी याकरिता हे कल्याणम्सारखा धार्मिक विधी हे वाघे लोक करत असतात.

महाराष्ट्रात खंडोबाचा जागरण हा सांस्कृतिक प्रकार मानला जातो तर आंध्रात 'पट्टनम्' म्हटले जाते. कर्नाटकच्या सर्वच मंदिरातून असे लोक वाघे आढळत असतात. काही इतिहासकारांच्या मते ही प्रथा बाराव्या शतकापासून आहे असे मत आहे. तर द्वापार युगातील यादव कुळाचे खंडोबा हे कुलदैवत असल्याचाही इतिहास सांगितला जातो.

काही वर्षापूर्वी कर्नाटक, आंध्र प्रदेशातील ओग्गय्य (वाघे ) अंगावर घोंगडीची कफनी, भंडारा ठेवण्याची वाघाच्या कातडयाची पिशवी, गळ्यात अडकवलेला कोटोमबा (पितळी अथवा तांबं धातूचे भंडार (हळद) ठेवण्याचे पात्र, हातात डमरू गडीवर त्रिशूळ, नाग रेखाटलेली चित्रे मल्हारीची कन्नड भाषेत गाणी म्हणत असताना जेजुरीत दिसून आली आणि यातूनच मग महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र यांच्यातील एक- एक सांस्कृतिक अनुबंध उलगडत गेले.

मराठी भाषेचे काहीच ज्ञान नसताना हे मैलार वाघे आपली सेवा करण्याकरिता जेजुरीत खंडोबाला येत असतात. खंडोबाला (मैलारला) वाहिलेले लोक वाघे आजही मोठया संख्येने दिसतात. असेच कर्नाटक राज्यातील देवरगुड्डा आणि मृण मैलार येथे होत असणा-या पारंपरिक कर्णिका उत्सवात हजारोंच्या संख्यने हे वाघे दिसून येतात.

वाघ्या होण्याच्या पद्धती अजूनही रूढ आहेत. वाघ्याचे दोन प्रकार इतिहासात आढळतात. घरवाघ्या व दारवाघ्या. घरवाघ्या नवसाच्या फेडीकरिता काही विशेष कालावधीत वाघ्याचा वेश परिधान करतात तर दारवाघ्या म्हणजे कायमस्वरूपी घेतलेली दीक्षा या दोन्ही रुढी-परंपरा या तीनही राज्यात आजही पाहावयास मिळतात. भाषेची भिन्नता शिक्षणाचा अभाव आणि परिस्थितीचे भान असलेला दक्षिणेकडील आणि महाराष्ट्रातील हे खंडोबाचे उपासक वाघे जातीभेद,

**विजयकुमार हरिश्चंद्रे, जेजुरी**

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज ७३ वि पुण्यतिथी. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता.**

सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. विकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन



सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली.

# ज्येष्ठ अभिनेते रवींद्र बेर्डे यांची चटका लावणारी एक्झिट

आधुनिक केसरी

मराठी सिनेसृष्टीला अनेक नामवंत कलाकार लाभले. या कलाकारांनी सिनेइंडस्ट्रीत उत्कृष्ट काम करून उत्तम कलाकृती प्रेक्षकांसमोर सादर केल्या. या मराठी इंडस्ट्रीतून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. मराठी सिनेमांमधील उत्कृष्ट अभिनेते रवींद्र बेर्डे यांचे निधन झाले आहे. रवींद्र बेर्डे यांनी मराठी सोबतच हिंदीमध्ये देखील आपल्या अभिनयाचा दबदबा निर्माण केला होता. वयाच्या ७८ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. रविंद्र बेर्डे यांनी 1965 मध्ये रंगभूमीवर पदार्पण केले होते. 300 हून अधिक मराठी चित्रपटांमध्ये त्यांनी आपल्या अभिनयाने लोकांची मने जिंकली आहेत. अभिनेते अशोक सराफ, विजय चव्हाण, महेश कोठारे, विजू खोटे, सुधीर जोशी आणि भरत जाधव



यांच्यासोबत रवींद्र बेर्डे यांच्या जोडीला पडद्यावर प्रेक्षकांचं भरभरून प्रेम मिळाले होते. रवींद्र बेर्डे यांनी एक गाडी बाकी आनाडी, खतरनाक, होऊन जाऊ दे, हमाल दे धमाल, चंगू मंगू, थरथराट, उचला रे उचला, धडाकेबाज, गंमत जंमत, झपाटलेला, भुताची शाळा, हाच सुनबाई चा भाऊ यांसारख्या गाजलेल्या सिनेमांमध्ये काम केले होते. तर हिंदीत सिंघम सारख्या सुपरहिट चित्रपटांमध्ये त्यांनी



महत्त्वपूर्ण भूमिका साकारली होती मराठी चित्रपट सृष्टीचा बादशहा लक्ष्मीकांत बेर्डे यांचे सख्खे भाऊ होते. आपल्या भावासोबत त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये काम करून प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण केले होते. रवींद्र यांच्या विनोदी भूमिका फार गाजल्या आशा चतुरस्त्र अभिनेत्याची एक्झिट झाल्याने संपूर्ण मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली असून त्यांचा चाहता वर्ग पोरका झाला आहे.वींद्र बेर्डे यांना मागील काही वर्षांपासून घशाचा कर्करोग झाला होता. त्यासाठी त्यांच्यावर टाटा रुग्णालयात उपचारही सुरू होते. श्वास घेण्यास त्रास होत असल्यामुळे त्यांना हॉस्पिटलमध्ये ऍडमिट केलेले. मात्र उपचारानंतर दोन दिवसांपूर्वीच त्यांना घरी देखील सोडले. सर्व काही सुरळीत चालू असताना अचानक त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांनी या जगाचा निरोप घेतला. त्यांच्या पाठी पत्नी, दोन मुलं, सुना नातवंड असा परिवार आहे.

रवींद्र बेर्डे यांच्या आणखीन एक ओळख म्हणजे ते मराठी चित्रपट सृष्टीचा बादशहा लक्ष्मीकांत बेर्डे यांचे सख्खे भाऊ होते. आपल्या भावासोबत त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये काम करून प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण केले होते. रवींद्र यांच्या विनोदी भूमिका फार गाजल्या.

**राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

# योगमहर्षी बी.के.एस.



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883


आधुनिक केसरी

**भारतीय योगशैलीने आता सबंध विश्व व्यापले आहे. योगदिनाच्या निमित्ताने त्याचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर होत आहे. निरनिराळ्या क्षेत्रांतील सेलिब्रेटींच्या योगातील सहभागामुळे त्याला प्रचंड वलयही प्राप्त झाले आहे. परंतु ज्यांनी योगशिक्षणाच्या प्रसारासाठी आपले अवघे आयुष्य खर्ची घातले, त्या योगाचार्य बी.के.एस.अय्यंगार यांचे मात्र विस्मरण होतंय. योगाला आज प्राप्त झालेले हे महत्व पाहता ते आठवायला हवे होते. कारण जगाच्या सर्वांगीण घडणीत त्यांचे योगदान अनमोल आहे.**

योगमहर्षी बी.के.एस. तथा बेल्लूर कृष्णम्माचार सुंदरराज अय्यंगार यांचा जन्म दि.१४ डिसेंबर १९१८ रोजी कर्नाटकातील बेल्लूर, जिल्हा कोलार येथे झाला. हा पहिल्या महायुद्धाचा काळ होता. तशात देशभर इंफ्ल्यूएन्झाची भयानक साथ आलेली होती. त्यांच्या वडिलांना बालपणी त्याची लागण झाली. त्याकाळी हा रोग महाभयंकर समजला जाई. तशात त्यांच्या वयाच्या आठव्या वर्षी त्यांचे पितृछत्र हरपले. ते या अय्यंगार कुटुंबातील नववे अपत्य होते. त्यांचे कुटुंब एकंदर अकरा मुलांचे होते. वडिल शालेय शिक्षक होते. त्यावरून घरातील आर्थिक परिस्थिती काय असेल, याची सहज कल्पना येईल. त्यात भरीस भर म्हणजे त्यांना क्षयाची बाधा झाली. त्याकाळी हे दोन्ही आजार राक्षसीच होते. तेव्हा त्यावर औषधोपचार जणू नसल्यातच जमा होते. घरची परिस्थिती आणि साथीचे आजारपण यामुळे त्यावेळी १३-१४ वर्षांचे असलेले योगाचार्य अशक्तपणा, कुपोषणासह औषधोपचारांचा अभाव यामुळे निराशेच्या खोल गर्तेत गेले नसते तरच नवल. त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांचे थोरले मेव्हणे एकदा त्यांच्या घरी आले. त्यांनी या अशक्त व रोगग्रस्तास पाहिले आणि ते म्हणाले, "अरे सुंद्रा- सुंदरराज, तू माझ्याबरोबर म्हैसूरला चल.'' त्यांचे नावही कृष्णम्माचारी होते. ते योगोपचार करीत आणि योग शिकवीत. त्यांना आपल्या घरी नेण्यामागे त्यांचा हेतू हा होता, की याला घेऊन जाऊन थोडेफार जुजबी उपचार करावे आणि त्याच्याकडून मुख्यतः घरगडी म्हणून कामे करवून घ्यावीत. ते त्यांच्यासोबत म्हैसूरला गेले व थोरल्या बहिणीकडे राहू लागले. कर्मधर्मसंयोगाने हा कालावधी केवळ सहा-आठ महिन्यांचाच होता. नंतर मेव्हण्यांनी त्यांना धारवाडच्या दौऱ्यावर नेले. त्याकाळचे पुण्याचे सिव्हिल सर्जन व्ही.बी.गोखले हे कृष्णम्माचारींच्या धारवाडच्या या योगवर्गासाठी आले होते. गोखल्यांनी त्यांच्याकडे एका योगशिक्षकाची मागणी केली. सुंदरराजला तेव्हा जुजबी इंग्रजी येत असल्याने त्यांनी गोखल्यांच्या विनंतीनुसार पुण्यास पाठविले.

इ.स.१९३८साली पुण्यातले घरभाडे योगप्रशिक्षकांना परवडणारे नव्हते. पुणे कॅम्प परिसरात एका भुताने पछाडलेल्या घरात भाडेकरू मिळत नसल्याने ते त्यांना किरकोळ भाड्याने मिळाले. लग्नाआधी अनेक वेळा पूर्ण दिवस त्यांना कॉफी व पाण्यावर काढावा लागले. सन१९४२ साली जेव्हा त्यांनी संसार थाटला, तेव्हा तर मेहनतीला मर्यादाच उरली नव्हती. पण तरीही त्यांनी योगविद्येचा सराव सोडला नाही. शरीराला वेदना व थकवा जाणवत होता. अशा वेळी आपल्या मुलांकडून ते हात, पाय, कंबर आदी दाबून घेत असत. सन १९५१ ते १९६६ सालापर्यंत योगविद्या शिकविण्यास निरनिराळ्या ठिकाणच्या दौऱ्यांमध्ये जेवणाचे अतिशय हाल होत असत. त्या महिना-दोन महिन्यात त्यांचे वजन १५ ते २० पौंड कमी झालेले असे. पुण्यात योगविद्या शिकवायची म्हटल्यावर त्यांनी स्वतःचीच शागिर्दी पत्करली. स्वयं योगशिक्षण, त्यासंबंधीचे स्वतंत्र प्रयोग व शिकविणे सुरू झाले. योगाद्वारे त्यांनी स्वतःच स्वतःवर उपचार करून रोगांना पिटाळून लावले होते.

योगाचे लोकाभिमुख आणि लोकोपयोगी अंग विकसित करून त्यांनी विद्यार्थ्यांना व्यवहार्य योग शिकविला. रोगोपचार, आरोग्य आणि स्वास्थ्य लोकांपर्यंत पोहोचविणे हा हेतू त्यामागे होता. हे काम व्यापक पातळीवर पोहोचविण्याच्या उद्देशाने



त्यांनी योगाच्या प्रचार-प्रसारार्थ अनेक विद्यार्थी जगभर घडवले. त्यातून योगविद्या जगभर झपाट्याने पसरली. त्यांचा प्रथम ग्रंथ 'योगदीपिका' हा याकामी मोलाचा दुवा ठरला. त्यांनी दुसरी वाहिनी हाताळली ती अशी- त्यांनी योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेवर अभूतपूर्व प्रभुत्व मिळवले होते. त्यांच्या पुस्तकांतील छायाचित्रांतून याची प्रचीती येते. त्यांनी योगासने कलेच्या अंगाने पेश केली. त्यांची योग-प्रात्यक्षिके म्हणजे एक अत्युच्च कलाविष्कार असे. त्यांना योगातील मायकेल ॲन्जेलो अशी ख्याती युरोपात प्राप्त झाली होती. एखादा कवी काव्य करतो किंवा गायक बंदिशी बसवतो व पेश करतो तसे ते आसन संचलन करून लोकांना एका अनोख्या कलाविष्काराचा आनंद देत असत. त्यांच्या अप्रतिम योग-कलाविष्काराच्या अनेक ध्वनिचित्रफिती उपलब्ध आहेत. तिसरी वाहिनी म्हणजे ते स्वतः जी योगसाधना करत ती एक तत्त्वसाधना होती. ती निरपेक्ष, निर्हेतुक असे. योग-तत्त्वज्ञान जगणे व श्वासणे हा त्यामागे उद्देश असे. पतंजली योगसूत्रांच्या कोंदणात त्यांची ही साधना बसविलेली होती. ते म्हणत, "आपण स्वतःमध्ये काय करतो ते जाणा. स्वतःलाच प्रश्नोत्तरे करा. हे शिकवता येत नाही, पण शिकता येते. हा दिव्य अनुभव दाखवता वा पाहता येत नाही. त्याचा केवळ बोधच होऊ शकतो. मी जेव्हा योगसाधना शिकवतो तेव्हा वैज्ञानिक असतो. जेव्हा ती पेश करतो तेव्हा कलाकार असतो. पण स्वतः जेव्हा ही साधना करतो तेव्हा तिचा मी एक निरपेक्ष उपासक असतो, पूजक असतो, अनुष्ठाता असतो. ते अनुष्ठान असते." अशा प्रकारे त्यांची योगप्रणाली त्रिमुखी होती. त्यांचे जगभरातील विद्यार्थी हा त्रिमुखी योग होय. योगा प्रशिक्षक अय्यंगार यांच्या मागचे दुर्भिक्ष्य संपले ते सन १९४३-४४ सालानंतरच. तोपर्यंत त्यांनी पुण्यात स्थिरस्थावर होत आपल्या योगविद्येच्या आधारावर जम बसवला होता. त्यांची आर्थिक विवंचनाही काहीशी कमी झाली होती. वयाच्या पस्तिशीनंतर तर आर्थिक संपन्नताही आली. योगासने-प्राणायामाने त्यांना केवळ स्वास्थ्य व आरोग्यच प्राप्त झाले नाही, तर दहा माणसांचे बळ, सामर्थ्य आणि उत्साह त्यांच्यात संचारले होते. त्यानंतर ६० वर्षांत त्यांनी इतके प्रचंड कार्य केले की सामान्य माणूस तीन-चार जन्मांतही तितके कार्य करू शकले नसते. या वाटचालीत जगभरात जवळपास १२५ ते १५० अय्यंगार योग संस्था सुरू केल्या. हा सगळा विश्वव्यापी पसारा त्यांनी लीलया सांभाळला होता. सुमारे दहा लाख जणांना त्यांनी योगदीक्षा दिली. परोक्ष-अपरोक्ष ६०-७० लाख विद्यार्थी घडवले. जागतिक स्तरावर योगशिक्षणाचे संपूर्णपणे एकहाती व्यवस्थापन करून त्यांनी चमत्कारच घडवला होता. ५५-५६व्या वर्षी त्यांच्या शारीरिक क्षमतेबद्दल युरोपातील डॉक्टरांनी आश्चर्य व्यक्त कले. त्यांच्या काही वैद्यकीय चाचण्याही केल्या. त्यांची फुफ्फुस क्षमता १८-२० वर्षांच्या ॲथलीटला लाजवील अशी होती. पूर्वायुष्यात त्यांना फुफ्फुसांचा क्षय झाला होता. हे आपल्याला अविश्वसनीय वाटत असल्याचे या डॉक्टरांनी कबूल केले. त्यांच्या बाबतीत दुसरी अविश्वसनीय वाटावी अशी गोष्ट म्हणजे मृत्यूच्या वेळेखेरीज ते कधीही हॉस्पिटलची पायरी चढले नव्हते. अनेकांना वाटे की त्यांना ही शरीरसंपदा, स्वास्थ्य, आरोग्य आणि सामर्थ्य हे योगासने व प्राणायामाने प्राप्त झाले होते. मात्र याबाबतीत ते म्हणत असत, "योगासने-प्राणायामाचे स्वास्थ्य व आरोग्य हे अवांतर फळ असते. योगसाधना ही आरोग्यासाठी नसते, तर त्यातून जीवनामृत मिळते. जे ज्ञान-विज्ञानस्वरूप आणि आत्मानंद स्वरूप असते. या सगळ्या गोष्टींचे फलित म्हणजे स्वास्थ्य, आरोग्य, बल व सामर्थ्य होय. या बाह्य रंगाला भुलून जायचे नसते. योगाचे प्रधान फळ म्हणजे आध्यात्मिक बल होय!"

अय्यंगार गुरुजींचा भारी पगडा संपूर्ण समाजावर होता. बालक-किशोरांपासून सर्व सामाजिक-आर्थिक स्तरांतील लोक, आस्तिक-नास्तिक, बुद्धिवादी-भाववादी अशा सगळ्यांना भावेल, रुचेल, पचेल अशा प्रकारे ते योगविद्या शिकवीत. ते अष्टपैलू योग मार्गदर्शक होते आणि त्यातील प्रत्येक पैलूमध्ये ते एकमेवाद्वितीय होते. त्यांचे विद्यार्थी त्यांना हार्ड टास्क मास्टर म्हणून ओळखत. पण ते तेवढेच आणि तसेच नव्हते. येहुदी मेनुहिनसारख्या कलाकाराला ते अत्यंत हळुवारपणे शिकवीत. अशा योगविद्या प्रशिक्षकांनी दि.२० ऑगस्ट २०१४ रोजी आपला देह ठेवला.

# आजही गुदमरते आहे स्त्री...



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**पुरूषप्रधान संस्कृतीने आणि विषमतावादी व्यवस्थेने स्त्रियांना दुय्यम हिन लेखून कायम दुय्यम वागणूक दिली गेली आहे. भारतीय संविधानाने जरी स्त्रियांना समान हक्क अधिकार, मान सन्मान व संधी दिली तरीही आजही लोकांच्या विचारात मात्र स्त्री समता वा स्त्री सन्मान पाहिजे तसा रुजला नाही. बाहेर कोणत्याही पदावर असलेल्या स्त्रीला घराची चौकट दिसतात. स्त्री पणाची जाणीव केली जाते. म्हणजे संविधानाने स्त्रि पुरुष भेद नाकारला असला तरी आजही स्त्रियांना वैयक्तिक जिवनात याला सामोरे जावं लागत आहे. काही स्त्रीयांच्या चुकिच्या वागण्यामुळे स्त्रीयांची प्रतिमा मलिन करून समाजाने स्त्रीला स्विकारण्याचा प्रयत्न केला आहे.**

वेगवेगळ्या माध्यमातून स्त्रीला व्याभिचारी, धोकेबाज दाखवून एक प्रकारे स्त्री जातीला दुय्यम व हिन लेखण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक प्रकरणामध्ये स्त्रियां पैशाच्या मागे जाऊन सुखी संसार मोडला, स्वतः च्या पायावर उभ्या राहील्या की नवऱ्याचा तिरस्कार केला गेला किंबहुना नवऱ्याला सोडून वेगळा संसार थाटला गेला हे सत्य कोणी नाकारू शकत नाही. परंतु हेच सर्व स्त्रीयांना लागु होत नाही. कारण आजही अनेक सुशिक्षित स्त्रीया या पुरुषप्रधान संस्कृती मध्ये समाजाचा व आईवडीलांचा विचार करून गुदमरून जिवन जगत आहेत. अनेक स्त्रिया जिवन जगताना सुखी दिसतात परंतु त्यांच्या मनातील दुःख, त्यांच्या भावना, व अपेक्षा कोणी समजून घ्यायला तयार नाही. बऱ्याच वेळी ज्याचा सोबत संसार करायचा तोच व्यक्ती योग्य नसल्याने, बायकोला बायकोचा दर्जा देऊन, नवऱ्याचे प्रेम देऊन कुटूबांची जबाबदारी स्विकारण्या ऐवजी बायकोच्या जिवावर जगुन बायको सोबत वाद करून स्त्रिच्या जिवनातील सुख, अपेक्षा व स्वप्नांचा भंग करतो. आईवडिलांनी मोठ्या अपेक्षेने व जवळ होते ते सर्व खर्च करून लग्न करून दिले आहे याची जाणीव ठेवून आज ना उद्या नवरा सुधारेल या आशेवर अनेक महिला जगताना दिसत आहेत. स्वतः सुशिक्षित, कमवत्या असुनही केवळ आईवडीलांच्या आनंदासाठी अनेक नवविवाहित महिला नवऱ्याकडे दुःख सोसत आहेत. बेरोजगार नवऱ्याला जगवण्यासाठी स्त्रियां घरच्या कामा सोबत नौकरी करून घर चालवतात. मेहनत करणे, कष्ट करणे यामुळे महिला दुःखी नाहीत तर बऱ्याच महिला दुःखी आहेत त्या फक्त एकाच कारणामुळे कि मेहनत करून तयार केलेले जेवन आनंदाने पोटात जात नाही. बायकोनेच काम करायचे पैसे कमवायचे, नवऱ्याची व आई वडिलांची इज्जत सांभाळण्यासाठी सर्वांसोबत हसत खेळत रहायचे, आणि घरी गेल्यावर दोन घास दोघांनी बसून प्रेमाने खाण्याऐवजी वाद करून नवऱ्याने जेवन करून तर बायको ने उपाशी झोपायचे, हे चार भिंतींच्या आतील दुःख अनेक महिलांचे आहे, पण बोलु शकत नाही, कोणाला सांगू शकत नाहीत. भावना मोकळ्या करणे खुप आवश्यक असते. नवरा भावना समजून घेत नाही, कधी प्रेमाने आपुलकी ने बोलत नाही. अशा वेळी एखादी स्त्री आपल्या भावना व मन एखाद्या व्यक्तीकडे करत असेल तरीही तीच्या चरित्रावर संशय घेतला जातो. म्हणजे घरात नवऱ्याने बोलायच नाही, माहेरचे दुःखी होतील म्हणून माहेरच्यांना दुःख सांगायचे नाही. अशा वेळी स्त्रीने मन कसे मोकळे करावे. तिच्या भावना कोणी समजून घ्याव्या ? स्त्रिया स्वतंत्र आहेत म्हणायचे आणि अशाप्रकारे



मानसिक दडपन देऊन स्त्रियांचे जिवन कठीण बनवून टाकायचे. स्त्रियांना किती संघर्ष किती तडजोड व किती संयम ठेवावा लागत असेल याची कल्पना करणेही अशक्य आहे. हि परिस्थिती निव्वळ बेरोजगार नवरे असलेल्या स्त्रियांचीच आहे असेही नाही. ज्या घरात नवरे खुप काही कमवतात, पैसा घर खुप मोठे आहे. परंतु त्या मोठ्या घरात मन मोठे नसते. नवरा कामावरून येताना जेवन करून, दारू पिऊन येतो, बायको नवऱ्याची उशीरा पर्यंत जेवण्यासाठी वाट पाहते. रात्री उशिरा आलेला नवरा जेवण्याच्या मनस्थितीत नसताना बायको उपाशी झोपते. म्हणजे सर्व काही तयार असूनही तिला ते खाता येत नाही, खाण्याची ईच्छा होत नाही एवढी ती स्त्री वैतागलेली असते. विवाहित स्त्रिया तर दुःखी कष्टी आहेत, परंतु अविवाहित मुलीही अशाच परिस्थिती मध्ये जिवन जगत आहेत. प्रेमाच्या नावाखाली अनेक जन मुलींना जवळ करून तिचा उपभोग करून घेतात. लग्न करायला नकार देऊन तिला भावनिक बनवून वारंवार भेटतात. मुलीची कधी कधी भेटायची इच्छा नसताना ही बदनामी करेल म्हणून इच्छेविरुद्ध जाऊन त्या भेटायला जातात, घरी सांगितले तर घरचे चुकीचे समजतील म्हणून अविवाहित मुली देखील प्रेमाच्या नावाखाली खुप गुदमरून आपले जिवन जगत आहेत. मुली प्रेमाच्या नावाखाली स्वतः चा खर्च, व चैनीच्या वस्तू मुलांकडून घेऊन आपल्या गरज पुर्ण करतात असे बोलले जाते परंतु हे जरी सत्य असले तरीही सर्वच मुली तशा नसतात. ज्या मुली खरं प्रेम करतात, आपल्या आयुष्याचा जोडीदार स्वतः निवडताना मुलींचा जो विश्वास घात होतो त्यामधून सावरण्यासाठी मुलींचे मत जाणून घेणारे खुप कमी लोक असतात. थोडक्यात काय तर आजही अनेक सुशिक्षित स्त्रिया मेहनत करून, कष्ट करून कुटंब चालवण्याची जबाबदारी घेण्यासाठी तयार आहेत. फक्त त्यांना गरज आहे त्यांना समजून घेऊन प्रेमाने बोलण्याची, त्यांची काळजी करणाऱ्या व्यक्तीची, कष्टाने कमावलेले खाताना नवऱ्याच्या प्रेमळ सहवासाची. परंतु स्त्रिया कमवतात, काटकसर करून काही पैसे बचत करतात असे असताना नवरा त्या पैशाची उधळण करून बायको सोबत आपुलकी व प्रेमाने वागत नसेल तर घर कस चालवायच ? प्रेम व आपुलकी कोणाकडून मिळवायची ? नवऱ्याचे दुर्गुण कोणाला सांगायचे ? मुलांचे पालण पोषण कसे करायचे ? नातेवाईकांमध्ये कसे जायचे यायचे ? एखाद्या वेळी एमरजन्सी आली तर पैशाची तडजोड कशी करायची असे अनेक प्रश्नांचे काहुर डोक्यात असताना नवऱ्याचे प्रेम आपुलकी व पाठीवर आधाराचा आणि विश्वासाचा हात नसेल तर त्या स्त्रिला किती वेदना होत असतील याचा विचार कधी कोणी केला का ? चेहऱ्यावर हास्य दाखवून कितीतरी दुःख लपवून, स्वतः च्या इच्छा दाबून संसार करणाऱ्या स्त्रिला मानसिक समाधान मिळतच नाही. बऱ्याच वेळा घरातील स्त्री केवळ एक कामगार म्हणून काम करते आणि त्या बदल्यात तिला मोबदला म्हणून केवळ दुःख मिळते. मानसिक व शारीरिक सुखाचा आणि स्त्रिचा संबध सुटला असेल तर त्या चे जिवन कारागृहातील कैद्यापेक्षाही जास्त दुःखी होते कारण कारागृहातील कैद्यांना स्वतः चे मत, भावना व्यक्त तरी करता येतात. बऱ्याच स्त्रियांना हा ही अधिकार नाही. बऱ्याच स्त्रियांचे नवरे स्त्रियांना मानसन्मान देत नाहीत, कोणताही निर्णय घेताना विश्वासात घेत नाहीत, बायकोला खर बोलत नाहीत, बायको काय बोलते त्यावर लक्ष देत नाहीत, बायको ने प्रेमाने बनवलेले जेवन ही ते आपुलकी ने खात नाहीत, बऱ्याच वेळा मित्रांसोबत बाहेरचे खाताना सोबत असलेला डबा उघडून बायको ने बनवलेला डबा मित्रांना खा अस न म्हणता तसाच डबा घरी आणून मित्रांसोबत बाहेरचे खाल्ले म्हणून बायकोच्या हवाली करून देतात. स्त्रियांचे प्रेम हे छोट्या छोट्या गोष्टी मध्ये असते. त्यांना मोठच काही पाहिजे अस काही नसते. बायकोला खरं बोलले, विश्वासात घेतले, बनवलेला डबा मित्रांसोबत खाल्ला तर हाच बायकोचा सर्वांत मोठा सन्मान असतो. परंतु काही काही स्त्रियांना तेही मिळत नाही. एकीकडे स्त्रियांच्या जिवनावर वेगवेगळे विनोद करून स्त्रिया पुरुषापेक्षा वरचढ कशा आहेत हे दाखवले जाते परंतु ज्या स्त्रिया स्वतः दुःख सहन करून, आईवडिलांचा, मुलांचा व समाजाचा विचार करून घरात नवरा असताना ही एकटेपणात जिवन जगतात अशा महिलांचे दुःख कमी होणे आवश्यक आहे. त्यांचाही विचार करून त्यांना मान सन्मान प्रेम आपुलकी व भावनिक सुख मिळणे आवश्यक आहे. आपण खुप प्रगती केली, पैसा, गाडी मोठे घर तयार झाले. परंतु मोठ्या घरात जर स्त्रियांचा श्वास गुदमरून त्यांना जगावे लागत असेल, त्यांना मानसिक व भावनिक सुख नसेल तर कितीही वैभव, कितीही मेहनत ही वायाच जाणार आहे. म्हणून महिलांना या दुःखातुन बाहेर येण्यासाठी स्वतः त्यांनी मन मोकळे करून आईवडील नातेवाईक यांना सांगायला पाहिजे, मित्र मैत्रीण यांच्या कडे मोकळे होऊन मन हलके करायला पाहिजे, आणि सर्वात महत्त्वाचे स्त्रियांना समजून घेताना डोक्यात कोणताही पूर्वग्रह नसायला पाहिजे तरच स्त्रियांच्या जिवनात आनंद येऊन त्यांना सुखी जिवन जगता येईल. नाहीतर भल्यामोठ्या घरामध्ये ही, मेहनत करुनही प्रेम आपुलकी व समाधान नसल्याने आजही स्त्री गुदमरत आहे.

# ऐसे तो न देखो के बहक जाए कहीं हम...

आधुनिक केसरी

**अशोक कुमार, मीना कुमारी आणि प्रदीप कुमार हे एके काळचे तीन बडे कलावंत `आरती' (१९६२), `चित्रलेखा' (१९६४), `भीगी रात' (१९६५) आणि `बहु बेगम' (१९६७) या चार चित्रपटांमधे एकत्र आले होते. या चारही चित्रपटांचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्यांना त्या काळचे आघाडीचे संगीत दिग्दर्शक रोशन (रोशन लाल नागरथ) यांनीच संगीत दिले होते. यापैकी `भीगी रात' हा चित्रपट कालिदास यांनी दिग्दर्शित केला होता. या चित्रपटात आय. एस. जोहर, शशिकला, कामिनी कौशल, राजेंद्र नाथ, राज मेहरा, अचला सचदेव, उल्हास, हरी शिवदासानी, अनुप कुमार, सुषमा शिरोमणी, पर्सिस खंबाटा आदी सहकलावंत होते.**

गीते मजरूह सुलतानपुरी यांनी लिहिली होती. या चित्रपटाची कथा मध्यंतरानंतर अधिक भावनिक व गुंतागुंतीची होत जाते. तिला मजरूह-रोशन जोडीने गीत-संगीताद्वारे पूर्ण न्याय दिला आहे.

या चित्रपटात दाखविल्याप्रमाणे तैलचित्रकार अजय (प्रदीप कुमार) मुंबईत आपले पिता द्वारकानाथ (उल्हास) यांच्यासमवेत राहात असतो. उद्योजक रामदास (राजन कपूर) यांची कन्या विनीताशी (शशिकला) अजयचा विवाह व्हावा, अशी द्वारकानाथ यांची इच्छा असते. अजय या गोष्टीला साफ नकार देतो. त्यानंतर अजय नैनितालला जातो आणि कर्नल भीम सिंह (हरी शिवदासानी) यांची कॉटेज भाड्याने घेऊन राहू लागतो. त्याच्या शेजाऱ्याची खासगी शिक्षिका नीलिमाशी (मीना कुमारी) त्याचा परिचय होतो. दोघांचे एकमेकांवर प्रेम बसते. मात्र नीलिमाची मालकीण पुष्पा (कामिनी कौशल) हिला लंडनमधला आपला विधुर भाऊ आनंदशी (अशोक कुमार) नीलिमाचे लग्न व्हावे असे मनोमन वाटत असते. त्यानंतर चक्रावून टाकणाऱ्या नाट्यपूर्ण घटना घडतात.

या चित्रपटातील "ऐसे तो न देखो के बहक जाए कहीं हम" हे मोहम्मद रफी आणि सुमन कल्याणपूर यांनी गायिलेले प्रणयगीत अजय (प्रदीप कुमार) आणि नीलिमा (मीना कुमारी) या प्रेमी युगुलावर निसर्गात चित्रित झाले आहे. उंच वृक्षांच्या आसमंतात आणि जलाशयात नौकाविहार करत हे युगुल प्रियाराधन करीत असते. अजय म्हणतो, असे माझ्याकडे पाहू नकोस नाहीतर माझे चित्त विचलित होईल; शेवटी मी माणूस आहे देवदूत नाही ! यावर नीलिमा त्याला म्हणते, असे काही तरी म्हणू नकोस नाहीतर मी इथेच संपेन; मीही माणूस आहे देवदूत नाही ! गीतकार मजरूह सुलतानपुरी यांनी दोघांच्या मनातल्या प्रेमभावना छान मांडल्या आहेत. रोशन यांनी या श्रवणीय गीतात वाद्यांऐवजी गायनावर अधिक भर दिल्याचे जाणवते. या गीताच्या ओळी पुढीलप्रमाणे :

**ऐसे तो न देखो के बहक जाए कहीं हम**
**आखिर को एक इन्सान हैं फरिश्ता तो नहीं हम**
**ऐसे न कहो बात के मर जाए यहीं हम**
**आखिर को एक इन्सान हैं फरिश्ता तो नहीं हम**
**अंगडाई सी लेती हैं जो खुशबू भरी जुल्फे**
**गिरती हैं तेरे सुर्ख लबों पर तेरी जुल्फे**
**जुल्फे न तेरी चूम लें ऐ माहजबीन हम**
**सुन सुन के तेरी बात नशा छाने लगा है**
**खुद अपने पे भी प्यार सा कुछ आने लगा है**
**रखना है कहीं पांव तो रखते हैं कहीं हम**
**फिका सा रुख ए नाज ये हल्का सा पसीना**
**ये नाचती आंखों के भंवर दिल का सफिना**
**सोचा है के अब डूबके**
**रह जाए यहीं हम**



**अनिल तोरणे**
तळेगाव दाभाडे, पुणे

# महाराष्ट्र दंगलीत होरपळला, ठोस उपाययोजना पाहिजेच !

आधुनिक केसरी

**देशात महाराष्ट्र दंगलीत अव्वल स्थानी असल्याचे समोर आले आहे. वर्ष २०२२ मध्ये महाराष्ट्रात दंगलीचे अनुमाने ८, २१८ गुन्हे दाखल झाले आहेत. तर राज्यातील ९, ५५८ नागरिक दंगलीमुळे प्रभावित झाले आहेत. बिहार राज्य ४, ७३६ प्रकरणांसह यादीत दुसऱ्या स्थानी तर उत्तर प्रदेश राज्य ४, ४७८ प्रकरणांसह यादीत तृतीय स्थानी आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या आकडेवारीतून हे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे आधी बिहार, उत्तर प्रदेश या राज्यांकडे गुन्हेगारी कारवायांसाठी आपसूकच बोट जात असे. मात्र आता तेथील आकडेवारी महाराष्ट्राच्या तुलनेत जवळपास निम्मी आहे. हे कसे झाले असेल ? या प्रश्नाचा अभ्यास राज्याच्या गृहमंत्री महोदयांपासून ते तळागाळातील प्रत्येक पोलीस कर्मचाऱ्याने करणे अनिवार्य आहे. 'आम्ही सत्तेत येऊन दीड वर्षच झाले आहे' , अशी फुटकळ कारणे देऊन उपयोग नाही.**

लोकसेवा करण्यासाठी निवडण्यात आलेल्या या क्षेत्राला न्याय देण्याचे दायित्व विशेषतः सत्ताधारी आणि त्यांनतर विरोधी पक्ष या दोघांवरही येते. दंगल होणे म्हणजे अराजक निर्माण होणे होय. समाजकंटकांना सामाजिक सलोखा, शांतता अप्रिय असते. त्यामुळे त्यात दंगल नामक मिठाचा खडा टाकून सामाजिक वातावरण धुमसते कसे ठेवायचे ? यासाठीची कटकारस्थाने रचण्याशिवाय यांच्या बुद्धीतून चांगले विचार बाहेत येऊच शकत नाहीत. समाजकंटकांनी महाराष्ट्राला बदनाम करण्याचा विडाच उचलला आहे, असे दिसते. मात्र दुसऱ्या बाजूला देशाच्या सुरक्षा यंत्रणा समाजाच्या रक्षणासाठी भिंत बनून उभ्या असल्याने समाजकंटकांना हवेतसे डावपेच रचण्यात येणारे अपयश सामान्य नागरिकांना दिलासा देणारे आहे. महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथील पडघा आणि परिसरात एनआयएने छापे टाकून भविष्यात अराजक माजवण्याचे इसिसच्या अतिरेक्यांचे मनसुबे उधळवून लावले.

पंथाच्या नावे स्वतःच्या समाजातील विशेषतः युवकांची माथी भडकवून त्यांची दिशाभूल करणाऱ्या सूत्रधारांना समाज, देश, माणुसकी, राज्यघटना प्रिय नसून त्यांना केवळ स्वतःचा पंथच प्रिय आहे. त्यासाठी जिहाद पुकारतील काय आणि हे काम करणे म्हणजे पवित्र काम असल्याचे धादांत खोटे सांगून स्वपंथातील युवकांना स्वतःच्या कंपूत येण्यासाठी प्रेरित करत राहून त्यांना तुम्ही आपले असल्याचे भासवण्याचे नाटक करण्यासाठी आटापिटा करण्याची सोंग करतील काय. हे ओळण्यात चूक करणारे अलगदपणे यांची शिकार बनून समाज, देशाचे कट्टर शत्रू बनतात. महाराष्ट्रात अशा घातकी लोकांचे प्रमाण वाढत आहे असे वाटते. अशा लोकांच्या हातात चाकू - सुरे - तलवारी - गावठी कट्टे इत्यादी हत्यारे देऊन विशिष्ट समाजावर तुटून पडण्यासाठी त्यांचा बुद्धी भेद करून करत उकसवलेले असल्याने ते एका मानवी यंत्राप्रमाणे सुसाटपणे काम करण्यासाठी सिद्ध होतात. अशी माथी भडकवलेली मानवी कुमक हाताशी असल्याने त्यांना हाताशी धरून दंगल घडवून समाजाचे लचके तोडले जातात. समाजऋण वगैरे सूत्र अशांच्या गावीही नसतात. दंगल घडवून स्वतःच्या पंथाची दहशत त्या परिसरात निर्माण करू इच्छिणारे समाजऋण काय फेडणार ? ठीक ठिकाणी दंगली घडवून सामाजिक मालमत्तेची अतोनात हानी केली जाते, त्याचेच ऋण यांच्याकडून वसूल होता होत नाही.

दंगल करणाऱ्या समाजकंटकांत मोठ्या प्रमाणावर अशिक्षितपणा - बेकारीही असते. असे असले तरी हे आत्महत्या करून जीवन संपवतात. असे कधी समोर आलेले नाही. उलटपक्षी दंगली घडवून समाजकंटक निष्पाप लोकांचा बळी घेतात म्हणजे त्यांची क्रूरपणे हत्या करतात, त्यांच्या संपत्तीची लयलूट करतात,



स्त्रियांची अब्रू लुटतात इत्यादी करणे म्हणजे त्यांना भूषणावह वाटते आणि पोलिसी ससेमिरा चुकवण्यासाठी, पकडले गेल्यास होणारी शिक्षा टाळण्यासाठी आधीच पळ काढतात. दंगल करायची ; पण जेव्हा परिणामांना तोंड देण्याची पाळी येते तेव्हा त्या आधीच फरार होत स्वतःचा जीव वाचवायचा. दुसऱ्याचा जीव घेणारा यांचा जीव म्हणजे मोलाचा. अशा रितीने विचार करन स्वतःचा जीव कसा वाचवायचा, सुरक्षित ठेवायचा तेवढी बुद्धी असते. मात्र असे लोक समाजात काय या जगाच्या पाठीवर नसलेले बरे अशी समाजप्रिय लोकांची धारणा आहे. समाजकंटकांचा समाजातील उपद्रव ही पुष्कळ मोठी डोकेदुखी आहे. कारण त्यांना तोडफोड करणे, जाळणे, हिंसक कारवाया करणे, चोऱ्या करणे या शिवाय काही येत नसते आणि 'पालथ्या घड्यावर पाणी' या प्रमाणे त्यांना कितीही चांगले शिकवले तरी ते आचरणातून प्रतिबिंबित होणारेही नसते. एकच गुन्हेगार वारंवार विविध गुन्ह्यांत पकडला जातो यावरून हे लक्षात येते. या कोडग्यांवर ना तुरुंगातील शिक्षेचा परिणाम होत ना उत्तमातील उत्तम समुपदेशनाचा परिणाम होत. यांचा ब्रेन वॉशच असा झालेला असतो की, चांगले ते यांना वाईटच वाटते आणि वाईट तेच चांगले वाटते. भारत जात - पंथ यांच्या संदर्भात अत्यंत संवेदनशील देश आहे. समाजकंटक हे सूत्र व्यवस्थित जाणून आहेत. हीच दुखती नस पकडून समाजाला अस्थिर करण्याचे कार्य होत आहे. त्यामुळे लोकांनी या सूत्रांविषयी सावधानता बाळगली पाहिजे आणि राहत्या विभागात तसेच नोकरीच्या ठिकाणी काही संशयास्पद लक्षात आल्यास लगेचच पोलिसांना कळवले पाहिजे. यामुळे भविष्यात होणारी जानमालाची हानी रोखण्याचे चांगले समाजकार्य होऊ शकते. त्यासाठी कायम सतर्क असणे अनिवार्य आहे. दंगलीत देशात अव्वल असणाऱ्या महाराष्ट्रासाठी तर हे सूत्र अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. लोकसंख्या वाढत आहे. विविध शाखांतील करोडोंच्या संख्येतील पदवीधर प्रतिवर्षी उत्तीर्ण होऊन बाजारातील स्पर्धेचा भाग होत आहेत. यांच्या हातांना काम मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी उद्योगधंदे पाहिजे. पायाभूत सुविधांसह जिथे सामाजिक वातावरणही उत्तम आहे, अशा विभागाची गुंतवणूकदारांकडून व्यावसायिक प्रकल्प उभारणीसाठी निवड केली जाणे साहजिकच आहे. आता महाराष्ट्र गुन्हेगारीत प्रथम स्थानी असल्यावर गुंतवणूकदार महाराष्ट्राकडे पाहताना कोणता दृष्टीकोन समोर ठेवतात ? हे त्यांनाच ठाऊक. कारण व्यावसायिक माणसाला वादविवाद न होता चारपैसे स्वतःही कमवायचे असतात आणि दुसऱ्याला म्हणजे कर्मचारी वर्गालाही देत त्यांच्याकडून काम करवून घ्यायचे असते. दंगल करणाऱ्या समाजकंटकांचा आणि नोकरी - व्यवसायाचा संबंधच येत नाही. माथी भडकवणारे, स्वतःला खलिफा वगैरे म्हणवणारे लबाड 'तुम्ही पैशांची चिंता करू नये', असे त्यांना आश्वासन देऊन त्यांच्याकडून देशद्रोही कारवाया करून घेतात. त्यामुळे या भाडोत्री अतिरेक्यांचा आणि प्रामाणिकपणे ८ - १० तास काम करण्याचा काडीमात्रही संबंध नाही. त्यामुळे नोकरी नसली तरी निराशा येऊन आत्महत्या करण्याचा प्रश्नच येत नाही. कुटुंबाला कोणतीही चणचण भासू नये यासाठी नोकरदार प्रसंगी ओव्हरटाइम करतात, तर काही जण आणखी एक जोड नोकरीही करतात. अशी माणसे दंगली कशासाठी, कोणासाठी आणि का करतील ? पोट भरलेले असल्यावरच तृप्ततेचा ढेकर येतो. दंगल करणाऱ्या समाजकंटकांचेही तसेच आहे. यांच्या आर्थिक तुमड्या भरल्या जात असल्याने यांना कसलीच चिंता सतावत नाही. परिणामी ते समाजात रान उठवण्यास मोकाट असतात. असे म्हणावे लागेल. दंगलीमुळे राज्याचा महसूलावर गंभीर परिणाम होत. त्यात जी काही सार्वजनिक मालमत्तेची हानी होते तिची डागडुजी करणे, ते शक्य नसल्यास प्रसंगी नवीन बांधकाम करावे लागणे यांवर पैसा खर्च होतो. दुसरे लक्षवेधी सूत्र म्हणजे पर्यटन व्यवसाय. दंगली होणारे राज्य अशी ख्याती झाल्यावर त्या ठिकाणी जाऊन आपला जीव का अडचणीत टाकायचा ? असा विचार अन्य राज्य, आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटकांकडून झाल्यास त्यामुळे होणारी आर्थिक हानी चिंतेत भर टाकणारी ठरू शकते. येथे दंगल करणारे नामानिराळे राहिले. मात्र त्यांनी दंगली करून जी आकडेवारी फुगवून ठेवली आहे त्याचे आर्थिक दुष्परिणाम दंगलीशी कोणताच संबंध नसणारे सामान्यजन भोगतात.

दंगलखोरांना चाप लावण्यासाठी, त्यांना लगेच फासावर लटकवण्यासाठी कठोर कायदे अनिवार्य आहेत. दंगल करणारे, त्यांचे मूळ सूत्रधार पकडले गेल्यावर त्यांना ताबडतोब फासावर का लटकवले जात नाही ? हा सामान्य लोकांना कायम सतवणार जटील प्रश्न आहे. समाजद्रोह्यांनी दंगली करायच्या आणि त्याचे वाईट परिणाम आम्ही का आणि कधी पर्यंत भोगायचे ? असाही संतप्त प्रश्न सामान्य जनता करत असते. त्याचे उत्तर तिला मिळणे हा तिचा हक्क आहे. दंगलीत होरपळायचे आणि त्यांनतरही जीव मुठीत घेऊन जगायचे. या जगण्याला काही तरी अर्थ आहे का ?

नेते सुरक्षा रक्षकांच्या गराड्यात सुरक्षित असतात. लोकसंख्या पाहता लोकांच्या रक्षणासाठी पोलीसांची संख्या नगण्य आहे. राजकिय वादविवाद करण्यातच नेत्यांचा दिवस कसा जातो ? हे त्यांनाही कळत नसेल. लोकांना सुरक्षित सामाजिक वातावरण देणे सर्वपक्षीय नेत्यांचे दायित्व आहे. दंगल होण्याची कुणकुण लागताच प्रसंगावधान राखत जमावाला थोपवण्यासाठी नेत्यांनी घराबाहेर पडले पाहिजे. त्यासाठी स्वतःच्या मतदारसंघाची चोख माहिती नेत्यांकडे पाहिजे. केवळ तोंडी नव्हे तर कागदोपत्री नियोजनही हवे. वाटल्यास त्याची रंगीत तालीमही करता येईल.असे आपण करतो का ? हा प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे. दंगल झाल्यावर पाहणी करताना झालेले नुकसान, पीडित लोकांचे अश्रू इतकेच डोळ्यांना दिसते. दंगली नंतरची स्मशान शांतता पाहायची नसेल तर दंगलच होऊ नये यासाठी आधीच कंबर कसा.

**जयेश राणे**
मुंबई

# शिक्षण साधनेतील वारसा व ऋणानुबंध!

आधुनिक केसरी

शिक्षण प्रक्रियेत शिक्षक व विद्यार्थी यांचे नाते अतिशय पवित्र व आपुलकीचे असते.शिक्षक हे ज्ञानदानाचे कार्य करतात आणि विद्यार्थी ते ज्ञान एकाग्रतेने ग्रहण करतात. शिक्षक व विद्यार्थी या दोघांत सुसंवाद होतो तेव्हा शिकवणे आणि शिकणे प्रभावी होते. हा सुसंवाद साधला गेला की विचारांचे आदान प्रदान होते. विद्यार्थी शाळेत रमतात आणि वर्गात स्थिरावतात.शिक्षणाची गोडी लागते,शिक्षणाची आवड निर्माण होते.आपले शिक्षक वर्गात केव्हा येतील व पुढील पाठ कधी शिकवतील ही उत्सुकता निर्माण होते. मी ज्या शाळेत होतो त्या शाळेत आम्ही विद्यार्थी,आमचे शिक्षक आणि आमची शाळा या सगळ्यांचा जो ऋणानुबंध जडला होता तो अवर्णनीय होता. जि.प. प्राथमिक शाळा उमरगा कोर्ट या शाळेत मी चौथी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. या शाळेतील शिक्षक समांधे सर,भोरे सर, गंगाधरराव मोरे सर, श्रीमती वायकर मॅडम, भाऊराव डोंगरे आणि व्यंकटराव घुमाडे यांनी आमच्या शिक्षणाचा पाया मजबूत केला. शांतिनिकेतन विद्यालय मुळकी उंबरगा, ता.अहमदपूर या शाळेतील शिक्षकांनी त्या काळात आम्हाला जे शिक्षण दिले त्या शिक्षणाने माझे व इतर अनेक विद्यार्थ्यांचे जीवन साकारले गेले. आम्ही जेवढे विद्यार्थी त्या शिक्षकांच्या हाताखाली शिकलो त्यातले बहुतांश विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रांत यशस्वीपणे कार्य करत आहोत. इंग्रजीचे बंकटराव गरड,अनंतराव बोरोळे, विज्ञानाचे गणेशराव गुळवे आणि आर.एल. सोमवंशी,गणिताचे अप्पाराव लोहारे, वाय. एम.पाटील, व्ही.एम.चलवाड,मराठीचे श्यामराव शेकडे आणि संभाजी परगे,हिंदीचे डी.आर. सोमवंशी, माधवराव कांडमगिरे इतिहासाचे नामदेवराव ठोंबरे, घोटे सर आणि खेळाचे ढाकणे सर व चित्रकलेचे हणमंत वाडकर सर या आदर्श शिक्षकांनी आम्हाला विषयज्ञान भरभरून दिले आणि आम्हाला वेळोवेळी जीवनाबद्दल आवश्यक ते मार्गदर्शन केले.आमच्यामध्ये संस्कार रुजवले,आशावादी व सकारात्मक दृष्टिकोन रुजवला. आमच्या पिढीचा शैक्षणिक काळ हा जणू सुवर्णकाळ होता!ही अतिशयोक्ती मुळीच नाही,हे वास्तव आहे.आमचा व आमच्या शिक्षकांचा जुळलेला शैक्षणिक ऋणानुबंध आजही कायम आहे. आम्हाला असे प्रामाणिक व कर्तव्यदक्ष शिक्षक लाभले हे आमचे भाग्य म्हणावे लागेल.अशा गुणवान शिक्षकांनी घडवलेले आम्ही काही विद्यार्थी शिक्षणक्षेत्रात शिक्षकी पेशाचे कार्य करत आहोत. त्यांनी दिलेला शैक्षणिक वारसा पुढे चालवत आहोत. त्यांनी आम्हाला घडविले आणि आम्ही आमच्या विद्यार्थ्यांना घडवत आहोत याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो! शिक्षण साधनेतील हा ऋणानुबंध असाच कायम टिकून राहिला पाहिजे.हा ऋणानुबंध आम्ही कायम जपला आहे.यापुढे आमचे विद्यार्थी हा ऋणानुबंध असाच जपतील अशी आम्हाला खात्री आहे. मागील वीस वर्षांपासून अगदी निष्ठेने शिक्षकाची नोकरी करताना मी अनेक मुख्याध्यापकांच्या हाताखाली काम केले आहे.अनेक सहकारी शिक्षकांचा सहवास लाभला आहे.जळकोटचे हणमंत कमलापुरे सर, उजन्याचे कार्तिक घाटीवाले सर यांचे शैक्षणिक व प्रशासकीय कार्ये अतिशय उत्तम व सर्व शिक्षक बंधू भगिनींना आदर व सन्मान देणारे होते. रामराव चव्हाण, विश्वनाथ विळेगावे, माधवराव वाघमारे, मारोती गोरगे, रामचंद्र देमगुंडे, मंदोदरी सुरनर, निर्मला नागरगोजे, महादेवी हुडगे, मनकर्णा राठोड, शांता भोसले, गयाबाई लहाने, बळीराम काकडे, संजीवन जाधव, बालाजी यरमुनवाड या सहकारी शिक्षक बंधू भगिनींच्या सहवासात शिक्षकी पेशाशी एकनिष्ठ राहण्याचा व या पेशात कर्तव्यदक्ष राहण्याचा धडा शिकायला मिळाला. आज मी ज्या शाळेत नोकरी करतोय ते माझे सहकारी अतिशय प्रामाणिकपणे अध्यापनाचे कार्य करतात याचा मला सार्थ अभिमान वाटतो.

**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट,ता.अहमदपूर
जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.

# राज्याला वीज देऊन पाप करतोय काय ?

## आमदार जोरगेवार सभागृहात भडकले

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्याला वीज पुरविण्यासाठी जगातील सर्वात प्रदूषित



असलेली थर्मल एनर्जी आम्ही तयार करतो. याचा परिणामही आम्हाला सोसावा लागत आहे. देशातील सर्वात प्रदूषित जिल्हात आमचे नाव आहे. मात्र आम्हाला याचा मोबदला मिळत नसेल तर हा अन्याय आहे. असे म्हणत राज्याला वीज देऊन आम्ही काय पाप करतोय काय? अशा शब्दात आमदार किशोर जोरगेवार यांनी सभागृहात बोलताना संताप व्यक्त केला आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर जिल्हासह वीज उत्पादक जिल्हांना वीज सवलत देण्यात यावी अशी मागणी केली आहे. यावेळी बोलतांना ते म्हणाले कि, हातमाग उद्योगांमध्ये काम करणा-या कामगारांसाठी सरकारने २०० युनिट विज मोफत करण्याचा निर्णय केला आहे. हा निर्णय कौतुकास्पद आहे. आता याच धर्तीवर वीज उत्पादन करुन प्रदुषण सहन करत असलेल्या वीज उत्पादक जिल्हांना घरगुती वापराची दोनशे युनिट विज मोफत देण्यात यावी, चंद्रपूरात मोठ्या प्रमाणात वनआच्छादन असतांनाही प्रदूषित जिल्हांची यादी काढल्यास पहिल्या पाच प्रदूषित जिल्हात चंद्रपूरचे नाव असेल असे ही ते यावेळी म्हणाले. आम्ही थर्मल एनर्जी निर्माण करतो म्हणून हे प्रदुषण आम्हाला सहन करावे लागत आहे. राज्याला आम्ही विज देतोय म्हणजे पाप करतोय काय? आम्ही उत्पादन केलेली वीज आम्हाला स्वस्त का नाही? अशा शब्दात त्यांनी यावेळी संताप व्यक्त करत चंद्रपूर जिल्ह्यासह वीज उत्पादन करणाऱ्या जिल्ह्यांना घरगुती वापरातील २०० युनिट वीज मोफत देण्यात यावी व उद्योगांना सवलतीच्या दरात वीज देण्यात यावी अशी मागणी हिवाळी अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी पुरवणी मागणीवर बोलतांना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

**ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारा :** ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधण्याची शासनाने घोषणा केली आहे. यासाठी चंद्रपूरात जागाही आरक्षित करण्यात आली आहे. मात्र या ठीकाणी ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह तयार करण्यात आलेले नाही. त्यामुळे घोषित करण्यात आलेले ओबीसी विद्यार्थ्यांचे वसतिगृह तयार करण्यात यावे अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिवेशनात केली आहे.

विशेष म्हणजे वीज उत्पादन जिल्ह्यांना २०० युनिट पर्यंत घरगुती वापराची वीज मोफत देण्यात यावी ही मागणी चंद्रपूर विधानसभेचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांनी सातत्याने लावून धरली आहे. या मागणीसाठी राज्यपाल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्ष, ऊर्जामंत्री यांना निवेदन दिले आहे. सदर मागणीसाठी त्यांनी मागील वर्षीच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनावर चंद्रपूर येथून ३ हजार मोटर सायकलचा मोर्चा धडकवला होता. या मोर्चाने राज्याचे लक्ष सदर मागणीकडे वेधले होते. मात्र या रास्त मागणीसंदर्भात यंदाच्या अधिवेशनातही कोणताही निर्णय घेतला जात नसल्याने आमदार जोरगेवारांचा संताप पाहायला मिळाला. आता या मागणीसाठी वीज उत्पादक जिल्ह्यातील लोक प्रतिनिधी समोर येतील का ? या कडे लक्ष राहणार आहे.

हिवाळी अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी महावितरण मधील अनेक समस्यांकडेही सभागृहाचे लक्ष वेधले असून येथील लाईनमनच्या समस्या सोडविण्यात याव्यात, गडचिरोली जिल्हा लोहखनिजाचे समृद्ध आहे. तेव्हा गडचिरोली लगत असलेल्या चंद्रपूर जिल्हा लोहखनिजावर आधारित उद्योग सुरु होइल यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात, लघु उद्योगांना इंधन पुरवठा व्हावा यासाठी महाराष्ट्र शासनाने खान महामंडळाचा वेकोली सोबत इंधन पूरवठा करार करणे आवश्यक आहे.चंद्रपूर येथील लघु-उद्योगांना सन 2017-18 पर्यंत कोळशाचा नियमित पुरवठा होत होता. परंतु सन 2022-23 मध्ये या आर्थिक वर्षामध्ये मार्च 2023 पर्यंत केवळ 3 महिन्यांच्या कालावधीसाठी कोळसा उपलब्ध झाले आहे. सदर लघु-उद्योगांना कोळशाचा वापर इंधन म्हणून होत असल्याने नियमित कोळसा पुरवठा होऊन चंद्रपुरातील लघु-उद्योगांना वाचविण्यासाठी महाराष्ट्र राज्य खाण महामंडळ विभागासोबत प्रलंबित असलेला एफएसए (FSA) करार तातडीने करण्यात यावा, चंद्रपूर येथील फेरो अलॉय प्लांट येथील कार्यरत स्थायी कर्मचाऱ्यांना औद्योगिक S-1 ग्रेड वेतन लागू करण्याचे न्यायालयाने आदेश दिले असतानाही कंपनी व्यवस्थापनाने अद्यापही सुधारित वेतन लागू केले नाही. त्यामुळे येथील कामगारांना औद्योगिक S-1 वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

# डॉ. विलास राजपूत यांना उत्कृष्ट आरोग्य सेवारत्न पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास राजपूत याना समता ग्रामीण विकास प्रतिष्ठान व आपले ज्ञानपंख वृत्तपत्र आयोजित पुरस्कार सोहळा कार्यक्रमात राज्यस्तरीय उत्कृष्ट आरोग्य सेवारत्न पुरस्कार मोठ्या सन्मानात मान्यवरांच्या हस्ते परिवारासह प्रदान करण्यात आला. या सोहळ्यात त्यांनी त्यांच्या सावळदबारा परिसरातील कार्यक्षेत्रात केलेली उल्लेखनिय कोविड काळात कामगिरीची दखल घेऊन माझ्या परिवारासमक्ष गौरविण्यात आले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ.ऋषिकेश कांबळे, सुप्रसिद्ध विचारवंत तथा गाढे अभ्यासक प्राचार्य नामदेवराव चापे सर, समीक्षक तथा साप्ताहिक झेपचे संपादक डी. एन जाधव, कवी तथा साहित्यिक प्रा. शिवाजी वाठोरे, आयोजक तथा आपले ज्ञानपंखचे मुख्य संपादक दशरथ सुरडकर, कार्यकारी संपादक प्रवीण तायडे, उपसंपादिका जयश्री सोनवणे, सहसंपादक संजय दांडगे माझे मित्रवर्य व सिंघम API देविदास वाघमोडे साहेब पिशोर पोलीस ठाणे, प्रा. जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते सावळदबारा आदी मान्यवरांच्या हस्ते हा "राज्यस्तरीय उत्कृष्ट आरोग्य सेवारत्न पुरस्कार" त्यानां प्रदान करण्यांत आला. ज्या महापुरुषाने या देशांत शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली व शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे खरे साधन आहे हे लक्षात विकासाचे कार्य केले त्या थोरांचे आदर्श समोर ठेऊन अहोरात्र कार्य केले म्हणून हा पुरस्कार देताना मनस्वी आनंद होत आहे असे मुख्य संपादक दशरथजी सुरडकर म्हणाले.

# गोंदियात लसूण बाजारात ३२० ते ३५० रुपये किलो

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** टोमॅटो, कांद्यानंतर आता लसणाचे भावही गगनाला भिडले आहे. दररोजच्या जेवणातील भाजीत किंचित पण महत्त्वाचा घटक असलेल्या लासणाला वर्षभर मागणी असतेच. मात्र, अलीकडे लसणाच्या किमती सातत्याने वाढत असल्याने गृहिणींचे किचन बजेट गडबडले आहे. आजघडीला गोंदियातील किरकोळ भाजी बाजारात लसणाची किंमत ३२० ते ३५० रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचली आहे. व्यापाऱ्यांच्या मते, अवकाळी पाऊस आणि खराब वातावरणामुळे पिकाचे नुकसान झाले, याचा उत्पादनावर विपरित परिणाम झाला. शिवाय, आवकही कमी झाली आहे. त्यामुळे लसणाचे दर वाढले असून यापुढे त्यात आणखी भर पडण्याची शक्यता आहे.



गोंदियातील ठोक भाजी बाजारात शेजारील मध्यप्रदेश, राजस्थान व गुजरातमधून लसणाची आवक होत आहे. खराब वातावरणामुळे लसणाच्या दर्जावरही फरक पडला आहे. लसणाच्या कमी आवकमुळे मागील काही आठवड्यांत किमतीत मोठी वाढ झाली आहे. व्यापाऱ्यांच्या मते, स्थितीत लवकर सुधारणा होण्याची शक्यता नाहीच. पण जानेवारीच्या शेवटपर्यंत नवीन पीक आल्यावरच या वाढलेल्या किमतींपासून काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो.

# राष्ट्रीय नामांकनात जिंतूरचे शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** शहरातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालया मधील संगणक अभियांत्रिकी अभ्यासक्रमास नॅशनल बोर्ड ऑफ अँकिडिटेशन तर्फे जून 2026 पर्यंत तीन वर्षांचे मानंकन प्राप्त झाल्याची माहिती प्रभारी प्राचार्य डॉ आर. टी. पाचकोर यांनी सोमवार दि 11 डिसेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

याबाबत बोलताना डॉ पाचकोर म्हणाले की शासकीय तंत्रनिकेतन ची स्थापना 1983 झाली झाली असली तरी अद्याप पर्यंत या संस्थेतील एकाही अभ्यासक्रमाला राष्ट्रीय मानांकन दर्जा प्राप्त झाला नव्हता. तीन महिन्यापूर्वी त्यांची प्रभारी प्राचार्यपदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी संस्थेमधील शैक्षणिक असुविधांचा आढावा घेतला व त्यानंतर ऑक्टोबर महिन्यातील शेवटच्या आठवड्यातील तीन दिवस राष्ट्रीय मानांकनाच्या तपासणीसाठी तज्ञांची एक समिती येणार असल्याचे त्यांना कळाले त्या या मानांकनास पात्र ठरण्यासाठी प्राचार्य पाचकोर व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी महाविद्यालयामधील अंतर्गत रस्ते, शिकवणी वर्गामध्ये छताला सीलिंग करून घेतली. विद्यार्थ्यांच्या स्वच्छतागृहाची नूतनीकरण केले, अंतर्गत रस्ते, पथदिवे, सर्व विषयाच्या प्रयोगशाळा, कार्यालय, ग्रंथालय,वस्तीगृह आदी सुसज्ज व अद्यावत केले. संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीं साठी शहरातून महाविद्यालयापर्यंत बस सेवा ही सुरू केली या शैक्षणिक संस्थेमध्ये मागील तीन वर्षापासून सर्व शाखांमध्ये 100% प्रवेश झालेले असून संस्थेच्या कॅम्पसमध्ये मुलाखतीचे आयोजन करून विविध नामांकित कंपनीद्वारे विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. आणि राष्ट्रीय मानांकनासाठी महाविद्यालयाने प्रस्ताव दाखल केलेला असल्याने मानांकन पाहणी समितीने दि 20,21 व 22 ऑक्टोबर रोजी या महाविद्यालयात भेट देऊन महाविद्यालयातील विध्यार्थ्यांसाठी उपलब्ध सर्व सुविधांची पाहणी करून आपला अहवाल वरिष्ठांना पाठवला व काही दिवसापूर्वी या महाविद्यालयाला राष्ट्रीय मानांकन दर्जा प्राप्त झाल्याचे माहिती महाविद्यालय प्रशासनास मिळाली ग्रामीण भागात असणाऱ्या महाविद्यालयास राष्ट्रीय मानांकनाचा दर्जा मिळाल्याने विद्यार्थी शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या कार्यक्रमाचे सूत्र संचालन करून आभार प्रयोगशाळा सहाय्यक सौ रंजना देवशी यांनी मानले या पत्रकार परिषदेला अधिव्याख्याता स्थापत्य प्रियेश कळमकर, के.के.चौधरी, वाय.बी. चरहाटे, एस.एस. पोतदार, पी.बी. काळे, ए.बी.गुट्टे,विष्णू कऱ्हाळे, आदी जण उपस्थित होते.ज्यावेळी या महाविद्यालयामध्ये प्रभारी प्राचार्यपदी नियुक्ती झाली त्यावेळी महाविद्यालयात सर्वच विभागात अनागोंदी कारभार होता महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, पालक यांना विश्वासात घेऊन आपण तीन महिन्यात महाविद्यालयात मोठ्या प्रमाणात विकास कामे केली महाविद्यालयाची वेबसाईट सुरू केली, अंतर्गत वीज पुरवठा,वस्तीगृहाचे खोल्या, रस्ते दुरुस्त केले. विद्यार्थी, प्राध्यापकांसाठी सेमिनार हॉल, लॅब व सर्व विषयांच्या प्रयोगशाळा अद्यावत केल्या, विद्यार्थ्यांना सर्व फिस भरण्यासाठी बारकोड पद्धत सुरू करून प्राध्यापक व इतर कर्मचाऱ्यांसाठी बायोमेट्रिक सुरू केली,वाचनाल्यामध्ये सौ.पत्की यांनी सुद्धा बारकोड पद्धतीचा वापर सुरू केला आणि रजिस्टर वरील नोंदी बंद केल्या. विद्यार्थ्यांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी,विजेची व्यवस्था करण्यात आली तसेच कायम स्वरूपी प्राध्यापक कमी असल्याने तासिका तत्वावर प्राध्यापकांच्या नियुक्त्या करून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

# शंभर टक्के करवसुलीसाठी विशेष अभियान

आधुनिक केसरी न्यूज



**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** नगर परिषद हदीतील धर्माबाद शहर, रत्नाळी व बाळापूर अशा नगर परिषद हद्दीतील मलमता धारकांकडून पाणीपट्टी कर, मालमत्ता कर आणि इतर अनुषंगिक कर पूर्णपणे वसुली साठी धर्माबाद नगर परिषद कार्यालयाचे मुख्याधिकारी सतिष पुदाके यांच्या मार्गदर्शनाखाली वसुली विशेष अभियान राबविण्यास सुरुवात झाली असून शंभर टक्के कर वसुलीसाठी कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनीयम 1950 चे कलम 150 (अ) नुसार तसेच धर्माबाद नगर परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 433 अन्वये डिसेंबर 2023 पर्यंत कराचा भरणा न केल्यास दरमहा शेकडा दोन टक्के दराने थकबाकी भरे पर्यंत दंड आकारण्यात येणार आहे.

नगर परिषद कार्यालयाचे प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे, मुख्याधिकारी सतिष पुदाके यांच्या मार्गदर्शनाखाली कर वसुली अभियान राबविण्यास सुरुवात झाली आहे.

शंभर टक्के कर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विविध विभागांचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत. नगर परिषद कार्यालयास व्यापारी गाळे , मालमता कर,पाणीपट्टी कर, इतर अनुषंगिक कर या माध्यमातुन महसूल प्राप्त होतो.प्राप्त होणाऱ्या महसुलातून जनतेसाठी विविध विकासात्मक अर्थसंकल्पाचे धोरण ठरविले जाते. त्यामूळे कर वसुली अभियानातून नगर परिषद कार्यालय आपला शासकीय महसूल शंभर टक्के वसूली चे उद्दिष्ठ ठविण्यात आले असून त्यासाठीचे अभियान प्रभावीपणे राबविले जात आहे. नगर परिषद हद्दीतील नागरिकांनी आपला कर भरणा वेळेवर जमा करून अधिकृत पावती घ्यावी व विलंबाने कर भरणा केल्यास अतिरिक्त दंड आकारण्यात येईल त्यामुळे नागरिकांनी वेळेवर कर भरून सहकार्य करावे असे आवाहन नगर परिषद मुख्याधिकारी सतिष पुदाके यांनी केले आहे.



# अवाजवी घरपट्टी रद्द करा : आ. फारुख शाह यांची मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** शहराच्या वाढीव घरपट्टीचा प्रश्न बिकट झालेला आहे. महानगरपालिकेने आकारललेली अवाजवी घरपट्टी रद्द करण्यात यावी म्हणून धुळे शहराचे आ.फारुख शाह यांनी हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीत मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांची भेट घेवून शहरातील नागरिकांचा असंतोष विदित केला आणि अवाजवी घरपट्टी रद्द करण्याची मागणी केली. धुळे शहर व हद्द वाढ भागातील नागरिकांना मूलभूत गरजा पूर्ण न करता शहरातील नागरिकांना त्याच्या घरपट्टी मध्ये अवाजवी वाढ केलेली आहे. त्या मुळे धुळे शहरातील नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण तयार झाले आहे शहरातील नागरिकांना सुविधा उपलब्ध न करता शहरातील नागरिकांना वाढीव घरपट्टी लावून त्यांना त्रास देण्याचे काम केले जात आहे. इतर महानगर पालिकांच्या तुलनेने धुळे महानगपालिकेची कर आकारणी जास्त आहे. तरीही नागरिक मनपा ला कर अदा करीत असतात मात्र महापालिका जोर जबरदस्ती करून वसुली करते वास्तविक पाहता पहिले सुविधा उपलब्ध करून दिले पाहिजे मग वसुली करायला हवी तरी शहरातील बेरोजगारी पाहता धुळे मनपाची. वाढलेली घरपट्टी तात्काळ रद्द करण्यात यावी अशी मागणी आ.फारुख शाह यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेवून केली आहे.

# भोगावती नदीची पाणी पातळी घटली

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** भोगावती नदीच्या पाणीपातळीमध्ये घट झाल्याने बालिंगा पाणी उपसा केंद्र पूर्णतः बंद झाले आहे. यामुळे बुधवारी निम्म्या कोल्हापूर शहराचा पाणीपुरवठा बंद झाला. अनेक भागांतील नागरिकांना पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागले. यावर्षी पावसाचे प्रमाण कमी राहिले आहे. यामुळे नदी, धरणातील पाणी पातळी नेहमीपेक्षा कमी आहे. भोगावती नदीतील पाणी पातळीत घट झाली आहे. यामुळे बालिंगा उपसा केंद्राचा भोगावती नदीतून उपसा बंद करावा लागला आहे.

नदीच्या पाणी पातळीमध्ये वाढ व्हावी याकरिता कोल्हापूर महापालिकेच्या जल विभागाकडून पाटबंधारे विभागाशी संपर्क साधला गेला आहे. मध्यरात्रीनंतर पाणी पातळी वाढण्याची शक्यता आहे. उद्या उपसा सुरू होईल, पण दाब कमी असेल. परवा दिवशीपासून पाणीपुरवठा पूर्ववत होईल, असे जल अभियंता जयेश जाधव यांनी सांगितले. बालिंगा उपसा केंद्राचा पाणीपुरवठा बंद झाल्यामुळे राजारामपुरीसह परिसरातील पाणीपुरवठा खंडित झाला आहे. निम्म्या शहराला पाणीपुरवठ्याची झळ बसली आहे. या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आतापासूनच कोल्हापूरकरांवर आली आहे. भोगावती नदीची पाणी पातळी कमी झाल्याने करवीर तालुक्यातील पाच ते सहा गावांच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. कमी प्रमाणात पाणी उपसा होत आहे. यामुळे पाणी वितरण खंडित, अपुऱ्या दाबाने होत आहे.

# विकसित भारत यात्रा कार्यक्रम थांबवला, गावात प्रवेश बंदी म्हणजे बंदी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे भडजी येथे आयोजित दि.१३ विकसीत भारत संकल्प यात्रा गावकऱ्यांनी परतावून लावली. मा.तहसीलदार व अन्य अधिकारी कर्मचारी यांनी ही विकास यात्रा शासकीय कार्यक्रम आहे यास सहकार्य करा असी विनंती केल्यावरही मराठा आरक्षण होत नाही वा मिळत नाही तोपर्यंत प्रवेश बंदी म्हणजे बंदी म्हणत कार्यक्रमच होऊ दिला नाही. तालुक्यातील मौजे सराई भडजी येथे शासकीय कार्यक्रम विकसीत भारत संकल्प यात्रा कार्यक्रमाचे आयोजन आज दि.१३ करण्यात आले होते. मात्र गाड्या यात्रा गावात घुसताच समस्त मराठा समाज एकवटला व विचारपुस केल्यावर गावकरी संतप्त झाले मराठा आरक्षण मिळत नाही तो पर्यंत गावात प्रवेश नाही म्हणजे नाहीच. मग ते काहीही असो असे म्हणत विरोध केला व एक निवेदन दिले. विनंती करण्यात आली परंतु तीही फेटाळून लावण्यात आली. आल्या पावल्या परत जा तक्रार हुजत नको म्हणून तहसीलदार यांनी सांगितले की मा जिल्हा अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार हा कार्यक्रम आहे. कुठल्याही पक्ष संघटना चा कार्यक्रम नाही व विनंती केली परंतु नाही म्हणजे नाहीच असे म्हणत विकसत भारत संकल्प यात्रा परतावून लावली .व विरोध दर्शविला. मा.तहसीलदार स्वरुप कंकाळ यांना याबाबत विचारणी केली असता त्यांनी सांगितले की सराईला विरोध झाला परंतु भडजी येथे मात्र आयुष्यमान कार्ड आरोग्य कार्डची वाटप केली. असे मा तहसीलदार यांनी सांगितले.




# पुणेकरांवर घोंगावतेय पाणीटंचाईचे सावट

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** खडकवासला साखळी प्रकल्पातील पाणीसाठा कमी होत असल्याने शहरावर पाणीटंचाईचे सावट निर्माण झाले आहे. महापालिकेने पाण्याचा दैनंदिन वापर मर्यादित ठेवावा, अशी सूचना जलसंपदा विभागाने महापालिकेला पत्राद्वारे केली आहे. महापालिकेनेही या पत्राची दखल घेतल्याने नव्या वर्षात पाणीकपात होण्याची शक्यता आहे. मात्र यासंदर्भात आढावा बैठक आणि आयुक्तांबरोबर चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे पाणीपुरवठा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील चार धरणातून पाणीपुरवठा करण्यात येतो. शहराची तहान भागविण्यासाठी महापालिका प्रतिदिन १ हजार ६५० दशलक्ष लीटर (एमएलडी) एवढे पाणी धरणातून उचलते. यंदा जलसंपदा विभागाने शहरासाठी वार्षिक १२.६० अब्ज घनफूट (टीएमसी) एवढा पाणीसाठा मंजूर केला आहे. यंदा समाधानकारक पाऊस न झाल्याने धरणात पुरेसा पाणीसाठा जमा झाला नाही. तसेच वाढत्या उन्हामुळे पिण्याच्या पाण्याची मागणही वाढली आहे. खडकवासला प्रकल्पात २४.१० टीएमसी पाणीसाठा शिल्लक असला तरी त्यापैकी ८.५४ टीएमसी पाणी रब्बी हंगामासाठी आरक्षित आहे. त्यामुळे १५.५० टीएमसी एवढा पाणीसाठा असून जूनपर्यंत या पाण्याचे नियोजन महापालिकेला करावे लागणार आहे.

# महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरिक महासंघ फेस्कॉमचे ४ थे अधिवेशन उत्साहात

## अध्यक्षस्थानी अरुण रोडे

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ फेस्कॉम चे अहमदनगर व नाशिक जिल्हा जेष्ठ नागरिक संघाने आयोजित केलेले ४३व्या वर्धापन दिनानिमित्तचे ४थे जेष्ठ नागरिक अधिवेशन शिर्डी येथील साई पालखी निवारा येथे मंगळवार(ता.१२) रोजी मोठ्या उत्साहात व आनंदात संपन्न झाले. अध्यक्षस्थानी अरुण रोडे होते. "खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे"या साने गुरुजींच्या प्रार्थनेने झाली. प्रास्ताविक आयोजन समितीचे अध्यक्ष श्रीराम कातकाडे यांनी केले. या समयी व्यासपीठावर केदुपंत भालेराव, माजी खासदार भाऊसाहेब वाघचौरे, सर्वोत्तम क्षीरसागर, दादा तिडके, भंदारे सर विवेक देशपांडे, वसंतराव मुठे,विनायक राऊत, मिलिंद सरकार, अण्णासाहेब टेकाळे, महादेव जागर, दिनकर पाटील कोकण विभाग श्री पाटील, सुरेश बागड, धंनजय चतुर व नांदेड मराठवाडा विभाग फेस्कॉमचे तेरकर, श्रीमती निर्मला कोरे, वैजापूर जेष्ठ नागरिक संघ सचिव धोंडिरामसिंह राजपूत,नानासाहेब होळकर, विजयराव राऊत, श्री,मुलानी सर, मनोहारी मनोयुवा या मासिकचे संपादक अंजुमान खान, फेस्कॉमचे माजी अध्यक्ष डी.डी.चौधरी, बी.आर. पाटील, अशोक होळकर यांची उपस्थिती होती. जेष्ठांना सरकारने सर्व प्रकारच्या वैद्यकीय सवलती द्याव्यात, एकाकी जीवन जगणाऱ्या जेष्ठ नागरिकाना पोलीस संरक्षण द्यावे, इत्यादी मागण्या करण्यात आल्या.



# क्रिकेटप्रेमींनी क्रिकेटमध्ये तालुक्याचा नावलौकिक करावा : मनोज पवार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील छत्रपती राजे संभाजी क्रीडा संकुल येथे शनेश्वर मित्र मंडळ संचलित प्रीमियर लीग २०२३ वर्ष २ रे क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ उद्योजक मनोज पवार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शनेश्वर मित्र मंडळ यांच्या वतीने उद्योजक मनोज पवार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पवार बोलतांनी म्हणाले क्रिकेट खेळणारे तसेच क्रिकेट प्रेमींनी क्रिकेट खेळा मध्ये तालुक्याचे नाव लौकीक करावे. यावेळी उपस्थित जावेद रंगरेज, विखार भाई, युसुफ भाई लोखंडवाला, आसिफ भाई, अविनाश जाधव, जावेद शालिमार, विशाल पाटील, इरफान भाई, किशोर बनसोडे, संदीप नरवडे,पवन ठाकूर, आदित्य देशमुख,सतिश खिल्लारे, बंटी जाधव, खिजर अली, मजहर पठाण, राकेश गायकवाड, रवी मोतींगे, आयान अली, फयाज शेख, गणेश वेताळ, शोएब पटेल, शनेश्वर सोशल ग्रुप मंडळ क्रिकेट टीम चे सदस्य, उद्योजक मनोज पवार मित्र मंडळातील सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# आजी-माजी नगरसेवकांची शिवसेनेच्या मेळाव्यास उपस्थित

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूर**

**जिंतूर :** शहरात तालुक्यातील हजारो अल्पसंख्याक पाथरी येथील नोकरी मेळावासाठी सहभागी झाले यासाठी टीकाखान यांच्यासह काही नगरसेवकांनी पुढाकार घेतला व मेळाव्यास अल्पसंख्यांकाचा मोठा प्रतिसाद मिळाला. पाथरी येथील महाराष्ट्र अल्पसंख्याक अध्यक्ष सईदखान यांच्या नेतृत्वात जिंतूर येथील हजारो अल्पसंख्याक कार्यकर्ते या कार्यक्रमासाठी रवाना झाले होते या मेळाव्यात अल्पसंख्यांकासाठी मौलाना आझाद महामंडळ करिता पाचशे कोटी रुपये निधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजूर केले. तसेच भविष्यात अल्पसंख्यांक साठी अनेक योजना व विकास निधीची मुख्यमंत्र्याकडे सईदखान यांनी मागणी केली तसेच जिंतूर शहराच्या विकासासाठी अल्पसंख्याकांना विकास निधीसाठी खासदार श्रीकांत शिंदे व सईदखान यांच्याशी टीकाखान यांनी चर्चा करून मागणी केली या मेळावासाठी जिंतूर नगरसेवक येथील टीका खान, मुन्ना सर, उस्मानखान पठाण, न्याजु लाला, फेरोज मिस्तरी, सिराजखान, याय्याखान, राजेश वैष्णव, माबुदभाई इनामदार यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला. पाथरी येथील शिवसेनेच्या मेळाव्यात खा.श्रीकांत शिंदे आले आसता जिंतूरच्या कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नगरसेवक उपस्थित राहिल्याने लवकरच शिवसेनेत प्रवेश करणार का...? नागरिकात चर्चेला उधाण.

# मजूर घेऊन जाणारे वाहन उलटले; १८ जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** धान कापणीसाठी महिला मजूर घेऊन जांभोऱ्याहून मोहाडीकडे जाणारी टाटा सुमो गाडी दुसऱ्या गाडीला ओव्हरटेक करण्याच्या नादात असंतुलित होऊन उलटल्याची दुर्दैवी घटना आज सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास मोहाडी तालुक्यातील मुंढरी बुज गावाजवळ घडली. या अपघातात चालकासह दोन महिला गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. १८ जण किरकोळ जखमी आहेत. गंभीर जखमींना भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

जिल्ह्यात सध्या सर्वत्र धान कापणीची कामे सुरू आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मजूरवर्ग सकाळच्या सुमारास धान कापणीच्या कामासाठी एका गावाहून दुसऱ्या गावाला किंवा जिल्ह्याबाहेरसुद्धा जात आहेत. मोहाडी तालुक्यातील जांभोरा येथील जवळपास १८ महिला आणि २ पुरुष असे २० मजूर आज सकाळी मोहाडी येथे धान कापणीच्या कामासाठी निघाले. हे सगळे एका टाटा सुमो गाडीत बसले. साडेदहा वाजताच्या सुमारास गाडी मुंढरी बुज गावाजवळ पोहोचली असताना समोरच्या वाहनाला ओव्हरटेक करण्याच्या नादात चालकाने वेग वाढविला. मात्र गाडी असंतुलित झाल्याने उलटली. चालकासह दोन महिला मजूर गंभीररित्या जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. जखमींना बाहेर काढले. नंतर बराच वेळ वाहतूक कोंडी झाली. करडी पोलीस स्टेशनचे ठाणेदार गायकवाड पुढील तपास करीत आहे.



# असंवैधानिकपणे वागणाऱ्या निष्क्रिय अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करा : सरतापे

आधुनिक केसरी न्यूज

**सुजित सातपुते**

**पिलीव :** महाराष्ट्र शासन,सोलापूर जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी माळशिरस विभाग अकलूज यांचे संविधान दिन साजरा करण्याचे आदेश असतानाही माळशिरस तालुक्यातील काही अपवाद वगळता इतर कामचुकार अधिकाऱ्यांनी वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे.२६ नोव्हेंबर रोजी शासन निर्णयाचा अवमान करून संविधान दिवस साजरा न करणाऱ्या कार्यालय प्रमुख व अधिकारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) माळशिरस तालुका यांच्यावतीने तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या नेतृत्वाखाली माळशिरस तहसील कार्यालयासमोर पुणे-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग रोखून धरत रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. दरम्यान २६ नोव्हेंबर रोजी शासन निर्णयानुसार सर्व प्रशासकीय, शासकीय कार्यालयामध्ये संविधान दिन साजरा करण्यात यावा असा आदेश असतानाही माळशिरस तालुक्यातील रजिस्टर ऑफिस,पंचायत समिती येथे गटविकास अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख अधिकारी,तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती अकलूज,सहकारी संस्था निबंध कार्यालय, निरीक्षक वजन माफी कार्यालय, सहाय्यक रजिस्टर कार्यालय अकलूज,राज्य उत्पादन शुल्क विभाग,अकलूज मंडळ कृषी कार्यालय, लघु पाटबंधारे उपविभाग कार्यालय अकलूज,तसेच लवंग मंडल कार्यालय,तांबवे तलाठी कार्यालय,वेळापूर तलाठी कार्यालय,मंडळ कार्यालय,माळशिरस नगरपंचायत उघडलीच नाही. भारताचे संविधान हे विश्वरत्न भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दोन वर्ष अकरा महीने आठरा दिवस परिश्रम करून लिहिले आणि भारत देशाला दिले आहे. परंतु संविधान दिनाचे महत्त्व कमी करण्याचा अधिकाऱ्यांचा खोडसाळ प्रयत्न असावा असा आम्हाला प्रश्न पडल्याने आम्ही रिपब्लिकन पक्षाच्या वतीने माळशिरस तहसील कार्यालयासमोर रस्ता रोको आंदोलन करून निषेध नोंदवून तहसीलदार यांच्यामार्फत पालकमंत्री यांच्याकडे संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची निवेदनाद्वारे मागणी करीत आहोत. संविधान दिवस साजरा करण्याबाबत दि. २४ नोव्हेंबर २००८ शासन निर्णयानुसार दरवर्षी विविध उपक्रमाने हा संविधान दिवस साजरा करायचा आहे असे असताना भारतीय संविधान संविधान दिनाबद्दल अनास्था दाखवणाऱ्या अशा मग्रुर मुजोर अधिकारी कार्यालय प्रमुख यांच्यावरती तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावी अन्यथा यापुढे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले संपूर्ण जिल्ह्याच्या वतीने सात रस्ता सोलापूर येथे तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल याची गांभीर्यपूर्वक दखल घ्यावी. अशा आशयाचे निवेदन माळशिरस निवासी नायब तहसीलदार अमोल कदम यांनी स्वीकारले. यावेळी एन.के साळवे, दयानंद धाईंजे, शामराव भोसले, तुकाराम बाबर, एस.एम गायकवाड, रमेश धाईंजे, आबा बनसोडे, नितीन मोरे, मिलिंद सरतापे, मारुती खांडेकर, समाधान भोसले, प्रवीण साळवे यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# धुळे जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा

## केंद्रीय सहा. आयुक्त हंसराज खन्ना यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त जिल्ह्यांच्या संदर्भात केंद्राच्या वतीने नेमण्यात आलेल्या समितीच्या प्रमुखांनी जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्याच्या दौऱ्या प्रसंगी धुळे येथे समितीचे प्रमुख केंद्रीय सहाय्यक आयुक्त हंसराज खन्ना, बिरंजन साहू व समितीचे सदस्य मुक्कामी असताना धुळे जिल्हा शिवसेना वतीने संपर्कप्रमुख मा. आ. अशोक धात्रक यांच्या नेतृत्वात त्यांची सर्किट हाऊस येथे भेट देऊन धुळे जिल्ह्यातील दुष्काळा बाबत जिल्हाल्यावर झालेल्या अन्यायासंदर्भात चर्चा करून निवेदनात निवेदन देण्यात आले. धुळे जिल्ह्यातील चार तालुक्यात यंदा पावसाने पाठ फिरविल्यामुळे या चारही तालुक्यातील अनेक महसूल मंडळात रब्बी पिकांचे अपुऱ्या पावसाअभावी प्रचंड नुकसान झाले आहे. धुळे जिल्ह्यातील शेतक-यांच्या भावना शासनापर्यंत सर्वच राजकीय पक्षांनी पोहविल्या असतांना धुळे जिल्ह्यात फक्त शिंदखेडा तालुका हा पुर्णपणे दुष्काळग्रस्त म्हणुन जाहीर करण्यात आला तर धुळे तालुक्यातील १३ मंडळामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात येवुन शिरुड / बोरकुंड हि २ मंडळे या दुष्काळसदृश परिस्थिती म्हणून जाणुन बुजून वगळण्यात आली. तर साक्री तालुक्यातील व शिरपुर तालुक्यातील अनेक मंडळामध्ये दुष्काळ पडूनही या तालुक्यांचा साधा विचार देखील केला गेला नाही यंदा धुळे जिल्ह्यात दुष्काळासोबत अवकाळी पावसामुळे देखील शेतकरी वर्गाचे प्रचंड नुकसान झाले असून गेल्या पंधरा दिवसापूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या कांदा, पपई, मका, डाळींब, कपाशी, पिकाचे प्रचंड नुकसान होऊन रब्बी सोबत खरीपाचा हंगाम देखील वाया गेला आहे. जिल्ह्यातील एकच तालुका महाराष्ट्र शासनाने दुष्काळी म्हणून जाहीर केला. हा जिल्ह्यातील इतर तालुक्यातील शेतकरी वर्गावर अन्याय करणारा निर्णय असुन जिल्ह्यातील एकूण ५५ महसुली मंडळापैकी ४० महसुल मंडळात टुष्काळ पडलेला असून संपूर्ण धुळे जिल्ह्याला दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून घोषीत करण्यात यावा. तसेच दुष्काळग्रस्त जिल्ह्यांना देयात येणाऱ्या आर्थीक सुविधा तसेच शेतकन्यांचे शेतीपंपाचे वीजबील, सोसायटी कर्ज व त्यांच्या पाल्यांसाठी शैक्षणीक फी माफी करण्यात येऊन कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यात यावा.

धुळे जिल्ह्यातील सर्व महसुल मंडळाचे नव्याने दुष्काळा बाबतचे अभिप्राय महसुल यंत्रणेकडून मागविण्यात यावे व लवकरात लवकर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करत जिल्हा दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करावा अशा आशयाचे निवेदन शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख माजी आ. अशोक धात्रक, जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, महानगर प्रमुख धीरज पाटील उपजिल्हाप्रमुख कैलास पाटील ,तालुकाप्रमुख बाबाजी पाटील, जनार्दन मासुळे ,शहर विधानसभा क्षेत्र प्रमुख भरत मोरे यांच्या उपस्थितीत देण्यात आले .यावेळी धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या संदर्भात केंद्रीय सहाय्यक आयुक्त खन्ना यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन शेतकऱ्यांच्या भावना शासनापर्यंत दिल्ली दरबारी पोहोचविण्याचे आश्वासन दिले. तसेच महाराष्ट्रातील विविध दुष्काळग्रस्त जिल्ह्यांत समितीचा हा दौरा सुरू असून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दिलासा देण्याचा प्रयत्न केंद्राकडून केला जाणार असल्याचे स्पष्ट केले.



# संपादित जमिनीचा तत्काळ मावेजा देण्याचे आदेश; राष्ट्रीय महामार्ग विभागाचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** शहरातील खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणारे डॉ.एस.आर. मारावार यांच्या मालकी जमीनीवर राष्ट्रीय महामार्ग विभागाने अतिक्रमण करून रस्ता तयार केला आहे. अद्याप त्या संपादित जमिनीचा मावेजा देण्यात आला नाही.जिल्हाधिकारी यांनी तात्काळ मावेजा देण्याचे आदेश देऊन संबंधित विभाग दूर्लक्ष करीत असल्याचे समजते. सन २०१८ मध्ये राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ (जुना२२२) विस्तारित करण्यासाठी कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग व उपविभागीय अधिकारी यांनी प्रक्रिया व अधिसूचना प्रसिद्ध केली द२०२२रोजी अंतिम निवाडा जाहीर करून याचिका कर्ता यांची गट क्रमांक ३३७ मधील 00, हे.0८ जमीन संपादित केली. सदर प्रमाणे फेरफार क्रमांक सात ६२९४ प्रमाणे सातबारा रेकॉर्डवर 00 हे 0८ आर आर जमीन राष्ट्रीय महामार्ग ६१ (ए) दुहेरी /चौपदरी करण्यासाठी जमीन संपादित केल्याचे नोंद असल्याचे म्हणणे आहे. तरी देखील कोणताही भूस संपादन मावेजा न देता डॉक्टर मारावार यांच्या जमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमण करून राष्ट्रीय महामार्गासाठी जमीन वापर केला आहे. दिवाणी न्यायालय भोकर यांनी जमिनीत अडथळा करू नये असा आदेश असताना देखील सदर आदेशाचे उल्लंघन केले आहे. गट क्रमांक ३ पैकी ००हे१५आर पैकी ००.०८ आरचा जमिनीचा मावेजा त्वरित देण्यात यावा किंवा त्यावर झालेले काम काढून घेण्यात यावे. सदर प्रकरणी नियमानुसार भूसंपादन कार्यवाही पूर्ण केली असून उपविभागीय अधिकारी भोकर कार्यालय स्तरावर कोणतीही कार्यवाही प्रलंबित नाही असे२०२३ च्या पत्रात कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग यांना कळविले असल्याचे दिसते. संपादित क्षेत्रामध्ये अनेक वाद तसेच दावे निर्माण होत असल्याकारणाने सदरबाह्य वर्ण रस्त्या करिता पूर्ण संपादित जमिनीची फेर मोजणी भूमी अभिलेख कार्यालयामार्फत केल्यानंतरच प्रस्तुत प्रकरणात निर्णय घेणे योग्य राहील असा अभिप्राय दिला आहे. अर्जदारानी दिवाणी दावा क्रमांक ९८/२०१३ दाखल केला होता. सदर प्रकरणात प्रतिवादी विरुद्ध डीक्री झाला असून अर्जदाराच्या गट नंबर ३७३ मधील नऊ गुंठे जमिनीमध्ये अडथळा करू नये म्हणून कायम आदेश पारित केला. सदर अवार्ड पारित झाल्यानंतर भूसंपादन कार्यवाही रद्द करावी, असे म्हटले असले तरी सदर अर्जदार यांची जमीन रस्त्यासाठी घेतली किंवा नाही हे त्यांनी सांगितले नाही व मोजणी केल्यानंतरच सदर बाब सिद्ध होईल. बाह्य वळण रस्त्यासाठी संपादित जमिनीची पुनर मोजणी व्हावी सदर जमिनीमध्ये अर्जदार यांची जमीन किती गेली आहे हे निश्चित करावे आणि त्याप्रमाणे संपादित संघाने तात्काळ मावेजा अर्जदार यांना द्यावे असा जिल्हाधिकारी यांनी आदेश दिला आहे. तरी संबंधित अधिकारी दूर्लक्ष खरीत आहे

# साहित्यिक, व्यंगचित्रकार मधुप पांडे यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** साहित्यिक, व्यंगचित्रकार, कवी आणि कुशल रंगमंच संचालक मधुप पांडे यांचे गुरुवारी सकाळी निधन झाले. ते ७७ वर्षांचे होते. काही दिवसांपासून त्यांची प्रकृती ठीक नव्हती. त्यांच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार ुरू होते. आज सकाळी त्यांचे निधन झाले. साहित्य क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या मधुप पांडे यांना साहित्य श्री हसीरत्न (काका हाथरासी पुरस्कार ट्रस्ट), विंध्य विभूती पुरस्कार, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, हिंदीसेवी सन्मान, विदर्भ हिंदी साहित्य संमेलन सर्वोच्च पुरस्कार, साहित्यिक सन्मानासह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. पहिल्या जागतिक हिंदी संमेलनाचे सहसंयोजक; मॉरिशसच्या चौथ्या जागतिक हिंदी परिषदेत भारत सरकारच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाचे ते सन्माननीय सदस्यही होते. खासदार सांस्कृतिक महोत्सवाचे ते पदाधिकारी होते. त्यांच्या अकाली निधनाने साहित्य क्षेत्राची कधीही भरून न येणारी हानी झाली आहे.



# तुरीच्या शेतात लावलेला १ कोटी ४० लाखांचा गांजा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** तालुक्यातील हत्ता शिवारात शेतक-याने तुरीच्या शेतात गांजाची झाडे लावली. तब्बल तीन एकरात गांजाची झाडे सापडली असून त्याचे वजन १४०२ किलो ७७० ग्रॅम आहे, ज्याची किंमत १ कोटी ४० लाख २७ हजार ७०० रूपये एवढी आहे. पोलिसांनी या प्रकरणी आरोपी अनिल घुमा चव्हाण (४५) रा. हत्ता ता. लोणार याच्या विरूध्द एनडीपीएस कायदा कलम २० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. बुलडाणा गुन्हे शाखा (एलसीबी) च्या पथकाने टाकलेल्या पाडीत हे पितळ उघडे पडले आहे. पोलिस अधीक्षक, अप्पर पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे प्रमुख अशोक लांडे यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे. या कारवाईने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. हत्ता शिवारातील गट नंबर १८१ मध्ये अनिल घुमा चव्हाण यांच्या तुरीच्या शेतात जागोजागी विरळ ठिकाणी गांजाची लागवड केली असून, याबाबतची गुप्त माहिती बुलढाणा गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. सदर कारवाई पोलिस अधीक्षक सुनिल कडासने, अप्पर पोलिस अधीक्षक बी. बी. महामुनी वांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा बुलढाणाचे पोलिस निरीक्षक अशोक लांडे, पीएसआय सचिन कानडे, पोहेकी बकाले, नापोकों राजेश शेजुळ, पोकों वैभव मगर, मनोज खाडे, दीपक वायाळ, महिला पोलीस वनिता शिंगणे आदींनी केली. सदर कारवाई मोठी असल्यामुळे रात्री उशिरापर्यंत चालणार असून, आरोपींनाही अटक केली जाणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. किती लाखांचा गाजा पकडला हे संपूर्ण झाल्यानंतरच कळेल, असेही पोलिसांनी स्पष्ट केले. या कारवाईने जिल्ह्यात गांजा लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहे

# शाळा व्यवस्थापन समिती निवडताना होतंय राजकारण?

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** शाळा व्यवस्थापन समिती ही शाळेची महत्वपूर्ण अशी समिती समजली जाते. या समितीतूनच शाळेच्या विकासाच्या दृष्टीने पाऊले टाकली जात असतात. शिक्षक आणि पालक यांच्या तील महत्वपूर्ण दुवा म्हणून या समितीकडे पाहिले जाते.शाळेशी संबंधित असलेले बरेच निर्णय हे शाळा व्यवस्थापन समिती यांच्या कडूनच घेतले जात असतात.त्यामुळे शाळा व्यवस्थापन समितीत सदस्य निवडण्यापासून ते अध्यक्ष निवडीपर्यंतची जी प्रक्रिया होत असते ती सुद्धा पारदर्शक पणे होणे आवश्यक आहे.कोणतेही राजकारण न होऊ देता शाळा व्यवस्थापन समिती तयार करण्याची जबाबदारी शाळेचे मुख्याध्यापक यांच्या सह शिक्षकवृंद यांची सुध्दा असायला हवी. ही प्रक्रिया नियमात आणि व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

परंतु आज ही अनेक शाळांमधून शाळा व्यवस्थापन समिती स्थापन होत असताना नियमांचे उल्लंघन होत असते.अनेकांना वाटत असते की, इथे राजकीय हस्तक्षेप झालेला आहे. नियमबाह्य पद्धतीने निवडप्रक्रिया पार पाडली जात असते.हे जर असे होत असेल तर निवड प्रक्रियेची नियमावली असून त्या नियमावलीचा काही उपयोग आहे की नाही? असा सवाल सुद्धा या अशा नियम बाह्य निवड प्रक्रियेवर होऊ लागला आहे.बऱ्याच शाळेतून शाळा व्यवस्थापन समिती तयार करत असताना जे काही नियम दिलेले असतात त्या नियमाला अनुसरुन ह्या निवड प्रक्रिया होताना दिसत नसल्याने अनेक जण यावर आपली नाराजी व्यक्त करत असतात. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष या पदाची निवड ही जे समितीचे सदस्य बनलेले असतात त्यांच्या तून होणे अपेक्षित असते.परंतु असे होत नसल्याने अनेकजण खंत व्यक्त करत असतात.बऱ्याच ठिकाणी संपूर्ण पालकवर्गामधून अध्यक्ष निवड प्रक्रिया पार केली जात असते.किंवा एखाद्या राजकीय व्यक्तीच्या हस्तक्षेपा मुळे सुद्धा अशा निवडी होत असतात.या बाबत चर्चा सुद्धा होत असतात.त्यामुळे असे घडत असेल तर नक्कीच हे पूर्णपणे चुकीच्या पद्धतीने निवडी होत आहेत आपलीच शाळा आहे. आपलेच विद्यार्थी या शिकत आहेत.म्हणून या कडे सुद्धा अनेक जण कानाडोळा करत असतात. शाळेत ज्या पालकांचे पाल्य शिकत असतात अशा किती तरी पालकांना वाटत असते की आपण या शाळा व्यवस्थापन समितीचा घटक बनले पाहिजे.परंतु या भानगडीत न पडता जसे होत आहे तसेच स्वीकारून एखाद्याला अध्यक्ष म्हणण्याची मानसिकता सुद्धा तयार करून घेत असतात. आज बऱ्याच शाळांच्या बाबतीत ही शाळा व्यवस्थापन समिती जणू एखाद्या राजकीय पक्षाची समिती असल्यासारखं तर काम करत नाही ना? असं म्हटलं तरी वावगे ठरणार नाही. जर निवडीत राजकीय हस्तक्षेप होणार असेल तर हे राजकीय पक्षांचे हस्तक्षेप करणारे चित्र आहे. इथे शाळा कमी आणि राजकीय वलय निर्माण झालेलं वातावरणच जास्त करून पाहायला मिळत असेल तर हे चुकीचे आहे. अनेक राजकीय पक्षाची लोकं सुध्दा अशा शाळा समितीत असतात. ते असण्याबद्दल काही हरकत नसते.

> वाघोशी ता .खंडाळा येथील शाळा व्यवस्थापन समितीची नुकतीच निवड झाली .परंतु त्या निवडीत पालकांच्या उपस्थितीत समितीचे सदस्य निवडले गेले .आणि अध्यक्ष पदासाठी दोघेजण इच्छुक होते . त्या ठिकाणी राजकीय लोकांच्या हस्तक्षेपामुळे समितीच्या सदस्यांव्यतिरिक्त इतरांच्या म्हणण्यानुसार म्हणजेच नियमबाह्य अशीच निवड करण्यात आली .जिथे सदस्यांमार्फत अध्यक्ष पदाची निवड व्हायला हवी होती .ती सदस्यांच्या माध्यमातून न होता .राजकीय हस्तक्षेपा मुळे झाल्याने या निवड प्रक्रिये कडे नियमबाह्य असेच पाहिले जात आहे .अशा पद्धतीची निवड करणे ही चुकीच्या पद्धतीने निवड झालेली असून शाळा व्यवस्थापन प्रक्रियेतील ही अध्यक्ष पदाची निवड प्रक्रिया ही हुकुमशाही प्रवृत्तीची वाटते .त्यामुळे अशा चुकीच्या पद्धतीने निवडी होत असलेल्या प्रकिये कडे गटशिक्षणाधिकारी यांनी लक्ष देणे गरजेचे आहे .
> **–गुलाब धायगुडे, माजी अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, वाघोशी**

# दिंडोरी लोकसभा मतदार संघातील शिवसेना कळवण तालुक्याची आढावा बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** शिवसेना मुख्य नेते तथा मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने युवानेते खा. डा. श्रीकांत शिंदे यांच्या सुचनेनुसार शिवसेना सचिव, उत्तर महाराष्ट्र विभागिय संपर्कनेते भाऊसाहेब चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली तसेच दिंडोरी लोकसभा मतदार संघाचे निरीक्षक तथा संपर्कप्रमुख सुनीलपाटील व सहसंपर्कप्रमुख राजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख भाऊलाल तांबडे तसेच महीला आघाडी जिल्हाप्रमुख मंगलाताई भास्कर यांचे प्रमुख उपस्थित कळवण येथे शासकिय विश्रामगृहावर आढावा बैठक संपन्न झाली.

यावेळी उपजिल्हाप्रमुख जितेंद्र पगार, तालुकाप्रमुख शरद पगार, महीला आघाडी तालुकाप्रमुख सत्यवती आहेर, महीला आघाडी शहरप्रमुख अर्चना पगार, उपशहरप्रमुख वैशाली सोमवंशी, सिमा पगार बैठकिस होते. बैठकी प्रसंगी संपर्कप्रमुख सुनीलभाऊ पाटील, सहसंपर्कप्रमुख राजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख भाऊलाल तांबडे, महीला आघाडी जिल्हाप्रमुख



मंगलाताई भास्कर यांचे हस्ते शिवसैनिक व महीला आघाडीच्या पदाधिकार्यांना नियुक्तीपत्र देण्यात आली. हेमत शेवाळे (उपतालुकाप्रमुख) राहुल हिरे (उपतालुकाप्रमुख) संदिप वाघ (युवासेना तालुकाप्रमुख) राहुल वाघ (शाखाप्रमुख नाळीद), शिवाजी बहीरम गनोरे, (खर्डे दि.गटप्रमुख) रोहण दादाजी पवार (शाखाप्रमुख कळवण) जोंगेद्र पवार ( मानुर गटप्रमुख), बबलु शिरसाठ (अभोणा गणप्रमुख), तसेच महीला आघाडीच्या पुनम आहेर उपतालुकाप्रमुख (मानुर गट),अश्विनी पवार उपतालुकाप्रमुख (कनाशी गट) यांना यावेळी नियुक्तीपत्र देण्यात आली.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर